म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय वाङ्मय
दा. क्र. २६८

BVBK-0400268
BVBK-0400268

शास्त्रज्ञांपुढील प्रश्नचिन्हे – ?

# दचकू नका! खरं आहे हे!

भालबा केळकर

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
२६८
किशोर २४५.

प्रमुख विक्रेते
रसिक साहित्य
अप्पा बळवंत चौक, पुणे

BVBK-0400268

प्रकाशक :
मो. द. नांदुरकर
अनमोल प्रकाशन
६८३ बुधवार पेठ
पुणे ४११००२

फेब्रुवारी १९७६

किंमत : तीन रुपये पन्नास पैसे फक्त

मुद्रक :
सौ. नलिनी गोखले
श्री मुद्रणालय
७१४ सदाशिव पेठ
पुणे ३०

# १. समर्थांची बेडकी



शिवाजी महाराज राजगडाच्या बांधकामावर देखरेख करीत असताना त्यांच्या मनात सर्व कामगार, फौज, लवाजमा, आणि गडावरून दिसणारा आसमंत पाहून विचार आले की, 'मी किती सामर्थ्यशाली, कितीकांचा पोशिंदा आहे!' तत्क्षणी समर्थ रामदासांनी प्रकट होऊन, तिथेच पडलेल्या बांधकामाच्या दगडा-पैकी एका दगडाला मधोमध फोडून आत पोकळी, त्यात चुळका-भर पाणी आणि त्यात जिवंत बेडकी असल्याचे दाखवून दिले आणि म्हटले, "शिवबा! तू समर्थ पोशिंदा खरा! या दगडातल्या बेडकीचेही तू पोषण केलेस ना! धन्यवाद!" शिवबाचा अहंकार गळाला. समर्थांचे त्यांनी पाय धरले व प्रमादाबद्दल क्षमा मागितली. तेव्हा समर्थ म्हणाले, "शिवबा! आपणा मानवांच्या कर्तबगारीचा अहंकार वृथा आहे. आपण निमित्तमात्र आहोत. खरा विश्वाचा

समर्थ पोशिंदा एकमेव परमेश्वर आहे. तो कोणत्याही चमत्कृतिपूर्ण प्रकारे त्याला हवे असलेल्या प्राण्यांचे वा वस्तूंचे पोषण करतो."

ही समर्थांच्या सामर्थ्याची कथा आपल्याला परिचित आहे. दगडाच्या पोकळीत बेडकी आली कशी? तिचे पोषण झाले कसे? असे चिकित्सक विचार ही कथा वाचून मनात येतात आणि त्यांना सुसंगत शास्त्रीय स्पष्टीकरण न मिळाल्यास आपण या कथांना दंतकथांच्या पंक्तीत बसवितो. पण अशा प्रकारच्या अनेक घटना 'चक्षुर्वैसत्यं' पद्धतीने समजल्या की आजचे ज्ञात शास्त्रीयज्ञान अपुरे आहे हे पटते. समर्थांच्या बेडकीच्या कथेशी साम्य असणाऱ्या खालील घटना मनोरंजक आहेत. बावीस एप्रिल १८८१ नेवाडामधील रुबी टेकडीजवळ 'वाइड वेस्ट' खाणीत सुमारे साठ फूट खोलीवर ज्यो मोलिनो नावाचा कामगार काम करीत होता. त्याने खाणीच्या बोगद्याच्या भिंतीतून पुढे आलेल्या एका खडकाच्या फटीत कुदळ खुपसून तो खडक उचकटून बाहेर काढला. तो जो पडला, तो ज्योच्या पायावरच, आणि ज्योच्या पायाला चांगलीच जखम होऊन त्याची कळ मस्तकापर्यंत गेली. ज्यो त्या खडकावर फारच संतापला. त्याने आपली कुदळ जोराने त्या खडकावर तडकावली. तो खडक फुटला. आणि आश्चर्याने त्याचे डोळे विस्फारून कपाळात गेले. कारणही तसेच होते. त्या दुभंगलेल्या खडकात मुठीएवढी पोकळी होती आणि ती पोकळी कोणत्या तरी जातीच्या बारीक पांढऱ्या किड्यांनी भरून गेली होती. ज्योने ते किडे उचलून पाहिले. प्रथमतः ते किडे जिवंत असल्याचे काहीही चिन्ह दिसत नव्हते. पण सुमारे अर्ध्या तासाने त्यातले काही किडे हळुहळू वळवळ करू लागले आणि तासाभराने

तर सारेच किडे चांगले जिवंत आहेत असे दिसले. इतकेच नव्हे तर ते हळुहळू चालत चालत बोगद्याच्या भिंतीवर सगळीकडे पसरले. आणि हे सारे आगळे, अनपेक्षित, धक्का देणारे दृश्य तेथील खाणकामगार तेथे गोळा होऊन आ वासून पाहात राहिले. खाणीच्या प्रमुख कामगाराने ते किडे आणि तो खडक हे सारेच 'यू. एस्. ब्यूरो ऑफ माइन्स' खात्याकडे पाठविले. काही दिवसांनी त्या खात्याकडून पत्र आले की, 'बंद खडकात हे किडे जगणे शक्यच नाही. तुमच्या कामगारांच्या बघण्यात काही तरी घोटाळा आहे.'

इ. स. १८९२ मध्ये क्लिफ्टनजवळ 'लाँगफेलो' नावाच्या खाणीत लोखंडाच्या खनिजाचा एक मोठा गोळा सापडला. तो मुळीच सच्छिद्र नव्हता. तो फोडल्यावर आत एक तांबूस रंगाची गांधीलमाशी सापडली. एल पासो येथील भूगर्भशास्त्रज्ञ श्री. झेड्. टी. व्हाईट यांच्याकडे तो खनिज गोळा आणि ती गांधीलमाशी दोन्ही पाठविली: त्याने आपल्या वाचनालयातील एका काचेच्या कपाटात, एका कागदावर ते सारे ठेवले. त्यानंतर सुमारे एका आठवड्याने ती गांधीलमाशी हालचाल करू लागल्याचे त्या शास्त्रज्ञाला दिसून आले. त्याने लगेच हे सारे काही तज्ज्ञांना दाखविले. नंतर ती गांधीलमाशी त्याने वॉशिंग्टन येथील 'स्मिथसोनियन' प्रयोगशाळेत नेऊन दिली. या साऱ्या प्रकाराला— म्हणजे ती माशी अन्नपाण्याविना त्या खनिजाच्या गोळ्यात किती वर्षे आणि कशी राहिली याला – काहीही शास्त्रीय स्पष्टीकरण सापडले नाही.

एवढेच कशाला, अशी एक बेडकीसुद्धा दगडात जिवंत सापडली आहे. १८७३ मध्ये सॅनफ्रॅन्सिस्कोजवळ डायब्लो टेकडीवर

ब्लॅक डायमंड नावाच्या कोळशाच्या खाणीत, खाणी–कामगारांना चुनखडीच्या खडकाच्या आत एक बेडूक आढळला. खडक फोडून तो बेडूक बाहेर काढला. खडकात त्याचा ठसा उमटला होता. तो बेडूक जिवंत होता. अर्थात् आंधळा होता आणि एकच दिवस जगू शकला. सॅन्फ्रान्सिस्कोच्या शास्त्रीय अकादमीकडे हे सगळे पाठविले. पण, 'छे, हे शक्यच नाही!' असेच त्यांचेही उत्तर आले.

याहीपेक्षा आश्चर्यकारक अशी एक सत्यकथा आहे बेडकी-बद्दलचीच. ओन्टॅरिओमधील अॅक्टन येथे ब्राऊन अॅन्ड हॉल या लाकूड–कामाच्या गिरणीत एक पाइन झाडाचा ओंडका कापला जात होता. त्याचे करवतीने तुकडे पाडले जात असताना, एक काळा डाग त्याच्या अंतरंगात दिसला. तो कदाचित् एखादा धातूचा तुकडा असला तर त्याच्यामुळे करवतीचे दाते खराब होतील म्हणून कामगारांनी त्याच्या भोवतालचा भाग हळूहळू कोरला, तो काय आश्चर्य! तो काळा डाग धातूचे टोक नसून लाकडाच्या मध्यभागी असलेल्या पोकळीचे तोंड होते. तो ओंडका दुभागल्यावर त्या पोकळीतून एक बेडूक उडी मारून बाहेर पडला! त्या पोकळीची आतली बाजू गुळगुळीत आणि गोलाकार होती. झाड दोनशे वर्षांचे जुने होते. ओंडक्याचा पोकळीचा भाग जमिनी-पासून साठ फूट उंचीवरचा होता आणि पोकळी भोवताली लाकडाची जाडी तीस इंच होती. अशा स्थितीत तो बेडूक त्या पोकळीत अन्नपाण्याविना व हवेविना जिवंत राहिला कसा? आणि आत गेला केव्हा व कसा? ते शास्त्रज्ञांना न सुटणारे कोडेच ठरले. १८२९ मध्ये लिव्हरपूलमधील जॉर्जेसबेसीन येथील पाण्याखालील मालधक्क्याच्या पायामधून दगडाचे मोठे ठोकळे बाजूला काढले गेले. त्यातील एक ठोकळा कापून त्याची पायरी

करावयाचे ठरले. त्या वेळी ठोकळ्यातील पोकळीतून एक लहानसा बेडूक बाहेर पडला. तो काही तास जिवंत होता. तो उड्या मारण्याचा प्रयत्न करीत होता. याही प्रकाराचे शास्त्रीय स्पष्टीकरण ब्रिटिश शास्त्रज्ञांना देता आलेले नाही. आणि तेही शास्त्रज्ञांपुढे एक प्रश्नचिन्हच राहिले.

या सर्व घटनांचा तपशील नोंदला गेला आहे आणि अजून तरी त्यांचे संगतवार शास्त्रीय स्पष्टीकरण सापडलेले नाही. याचाच अर्थ, या क्षेत्रात संशोधनास आणि शास्त्रीय प्रगतीस फार मोठा वाव आहे. शास्त्रज्ञांपुढची आजची प्रश्नचिन्हे म्हणजे पुढील प्रगतीच्या पायऱ्याच होत.

✦ ✦ ✦

# २. जगावेगळा पाऊस

पाऊस म्हटला म्हणजे पाण्याचाच असा सामान्यतः समज आहे आणि तो सर्वथा योग्यही आहे. निसर्गातल्या जलचक्रात घडणारी ती एक घटना आहे. पृथ्वीच्या जन्मानंतर घडू लागलेली ही घटना आजपर्यंत चालूच आहे. तिला एक नियमित स्वरूपही प्राप्त झाले आहे. आपल्याला जास्तीत जास्त माहीत असलेले पावसाचे जरा वेगळे स्वरूप म्हणजे गारांचा पाऊस. तोसुद्धा आपल्याकडे कधी काळी पडणारा. थंड हवेच्या थरामुळे घडणारा हा एक निसर्ग चमत्कार. म्हणून गारांचा पाऊस पडला म्हणजे मुलांपासून म्हाताऱ्यांपर्यंत सारेच हर्षभरित होतात. गारा वेचायला आणि खायला पुढे सरसावतात. एकच गोंधळ माजवतात.

गुणी माणसावर स्तुतीचा वर्षाव होतो आणि दुर्गुणी माणसावर शिव्याशापांची वृष्टी होते.

पुराणकाली अयोध्येचा राजा रघु हा मित्राच्या गुरुदक्षिणा दानासाठी कुबेरावर चालून जाऊ लागला तेव्हा कुबेराने अयोध्ये-वर सुवर्ण मोहोरांचा पाऊस पाडला असे म्हणतात.

पण ही पुराणातली वांगी म्हणून आपण फारसे लक्ष न देता ती सोडून देतो. कारण पावसात पाण्याशिवाय आणखी कशाची वृष्टी होईल ही कल्पनाच आपल्या मनाला रुचत नाही, पटत नाही. आपण आवेशाने म्हणतोही तसे की पाऊस म्हणजे फक्त पाण्याचाच.

हां ! असे नका हं म्हणू. प्राचीन इतिहासाची पाने चाळली तर कधी कधी, कुठे कुठे असे आगळे, जगावेगळे पाऊस पडले

फ्लयांडरमधील डिक्समुडी आणि ब्ल्यान्कनबरी येथेही रक्ताचा पाऊस पडला होता.

अमेरिकेतील मॉनट्रियल शहरी एक वेळ शाईचा पाऊस पडला होता. त्याची साद्यंत हकीकत अशी :

एके दिवशी मॉनट्रियलवर आकाश भरून गर्द काळोख पडला. हे ढग अमेरिकेभर थोडयाबहुत प्रमाणात पसरलेच होते. मेन प्रांतावर तर या समयी फारच अंधारून आले. प्रतिक्षणी विजा चमकून मोठा गडगडाट सुरू झाला. ह्या भयंकर उत्पाताने पुष्कळ लोक घाबरून गेले. मॉनट्रियल शहरावर तर फारच अंधार पडला होता. रविवारी दिवसाढवळ्या डोळयात बोट घालीन म्हटले तर दिसेना. सर्व वातावरणात काही तरी उदी रंगाचे दाट द्रव्य भरून राहिले आहे असे वाटे.

• मंगळवारी सकाळी लांबवर तोफखाना सुरू केल्याप्रमाणे आवाज होऊन भूकंपाचा एक धक्का बसला. हे धक्के पुढे पुढे वाढू लागले. तेव्हा सर्वांचे लक्ष तिकडेच लागले. तीन वाजून वीस मिनिटे झाल्यावर अंधाराची परिसीमा झाली. विजेचा चकचकाट सुरू झाला. एक मोठा गडगडाट झाला. शहरातील मोठमोठ्या इमारती हादरून गेल्या. लगेच शाईचा मुसळधार पाऊस सुरू झाला. चार वाजायच्या सुमारास आकाश निरभ्र होऊ लागले. मग हळुहळू सर्व शहरभर पसरलेली शाई सुकून गेली.

उत्तर ध्रुववृत्ताकडे कधी कधी तांबडया बर्फाचा वर्षाव झाल्याचा लिखित दाखला आहे.

इटलीमध्ये बेडकांचा पाऊस वारंवार पडल्याचा दाखला आहे. पर्जन्यापूर्वी नावाला नसलेले बेडूक पर्जन्यानंतर अमाप संख्येने पायात घोटाळू लागतात.

पॅरिसमध्ये तर माश्यांच्या पावसाची हकीकत सर्वतोमुखी आहे. एके दिवशी रात्री पॅरिसमध्ये तुफानाचा वारा सुटला. मागाहून पर्जन्याची सर आली. त्यातून सारे मासेच मासे पडले. रस्ते, गल्ल्या, कौलारे सारी माश्यांनी भरून गेली. लोक आश्चर्याने अगदी चकीत होऊन गेले.

खरोखर जगावेगळेच हे पाऊस ! त्यावेळी तर शास्त्रज्ञांची बुद्धी काही काळ अशा पावसांच्या वार्तांनी अगदी गुंग होऊन गेली असल्यास नवल नाही. त्यांच्यापुढे अनेक प्रश्नचिन्हे उभी राहिली. पण त्यांनी हळुहळू अशा लोकविलक्षण पावसांबद्दल शास्त्रीय संशोधन करायला सुरुवात केली. त्यातली काही कोडी त्यांना उलगडली.

झंझावात सुटला म्हणजे त्याचा वेग दर तासाला ऐंशी मैलापर्यंत असतो. तो मोठमोठाले वृक्ष तर उन्मळून पाडतोच, पण घरावरची कौले, दगड, धुरळा, माती, वाळू इत्यादी पदार्थ आकाशात खूप उंच नेतो. आणि कोठेतरी शेकडो कोस गेल्यावर त्याचा वेग कमी झाला म्हणजे आपोआप त्या पदार्थांची वृष्टी होते. यातूनच दगडांचा पाऊस, वाळूचा पाऊस या चमत्कृती निर्माण होतात.

ज्वालामुखीतून निघणाऱ्या खनिज पदार्थांची वृष्टीही अशाच तऱ्हेने दूर अंतरावर होते. त्यातूनच लोखंडाच्या खड्यांचा पाऊस, पाऱ्याचा पाऊस हे निर्माण होत असावेत.

जोराचा दक्षिणवारा सुटला म्हणजे सहारा वाळवंटातील वाळू आकाशात जाऊन ती भूमध्य समुद्रापलीकडे जाऊन सिसिलीत वाळूचा पाऊस पडतो.

रक्ताचा पाऊस पडल्या जागचे नाल्यातले रक्त एका डॉक्टराने बादली भरून आणले. त्याचा एक बिंदू सूक्ष्मदर्शकाखाली तपासला. तेव्हा त्याला आढळून आले की तो बिंदू स्वच्छ पाण्याचाच आहे. पण त्यात कोटयावधी लाल रंगाचे सूक्ष्म किडे गजबजताहेत.

डिक्समुडी आणि ब्लयांकनबरी येथे पडलेल्या रक्ताच्या पावसाच्या बिंदूत आसपासच्या जंगलातील वनस्पतीपासून निघालेले कोबाल्ट हायड्रोक्लोरेट हे सत्त्व मिसळले आहे असे दिसून आले.

शाईच्या पावसाच्या थेंबातही असेच एका वनस्पतीपासून निघालेले द्रव्य मिसळलेले आढळून आले.

उत्तर ध्रुववृत्ताकडे झालेल्या तांबड्या बर्फाच्या वृष्टीचा शास्त्रीय अन्वयार्थ लावायचा प्रयत्न झाला तेव्हा असे दिसले की त्यात जमिनीतील लोखंडाच्या लाल खनिजाचे मिश्रण झाले आहे.

बेडकाच्या पावसातून आलेले बेडूक अगदी ताजेतवाने दिसत होते. हे इतके बेडूक ढगातून उतरले का? छे:! ते ढगाइतक्या उंचीवरून आले असते तर असे दिसले नसते.

बारीक बेडक्या बहुत करून धुरळ्यात असलेली अंडी पावसाबरोबर फुटून बाहेर निघतात. मोठाले बेडूक असतात ते जमिनीवरच्याच जवळपासच्या नदी-तलावातील पाण्यातून वाऱ्याच्या जोराबरोबर उडून येऊन पडतात.

प्राणिशास्त्रवेत्ता थिओफ्रेस्टस यानेसुद्धा हे स्पष्टीकरण मान्य केले आहे.


शिनोर रेडी नावाच्या गृहस्थाने तर बेडकाच्या पावसातले काही बेडूक घेऊन त्यांची पोटे फाडून दाखविली. पोटात झाडपाला आणि अर्ध-बोबडे चावलेले बेडकांचे भक्ष्य होते. हे बेडूक जर ढगातून आलेले असते, तर ह्या वस्तू त्यांच्या पोटात कशा मिळाल्या असत्या ?

माश्यांचा पाऊस पडला तेव्हा लोकांची कल्पना होती की हे मासे ढगातूनच पडले असावेत. पण ज्यां कित्येकांची घरे तलावाच्या आणि नदीच्या काठी होती, त्यांनी निराळीच हकीकत सांगितली. ते म्हणाले, 'रात्री ज्यावेळी तुफान वारा सुटला, त्यावेळी तलावांच्या आणि नद्यांच्या पाण्याचा दोन दोन माड, तीन तीन माड उंचीचा स्तंभ उभा राहिला. त्याचे तुषार सर्वत्र आकाशात पसरून जलाशय कोरडा ठणठणीत पडला. मोठाले मासे मात्र शिल्लक राहिले. बारीक मासे नावालाही शिल्लक उरले नाहीत. ते सर्व वाऱ्याच्या सोसाटयात कुठे गेले याचा त्यांना पत्ता लागेना. तेच मासे पर्जन्यरूपात पॅरिसवर पडले असावेत.

याप्रमाणे जगावेगळया पर्जन्यवृष्टीला शास्त्रीय स्पष्टीकरण आहे यात शंका नाही. पण काही काळ अशा पर्जन्यवृष्टींनी शास्त्रज्ञांपुढे प्रश्नचिन्हे उभी केली हे मात्र निःसंशय.

✦ ✦ ✦

# ३. निसर्गही चक्रम होतो !



तसे म्हटले तर हा प्रश्नच चुकीचा आहे. निसर्ग-नियम अगदी शास्त्रोक्त आहेत. निसर्गातल्या प्रत्येक घडामोडीला शास्त्रीय बैठक आणि स्पष्टीकरण आहेच. जेव्हा एखाद्या घडामोडीची शास्त्रीय बैठक आणि स्पष्टीकरण आपल्या बुद्धीच्या पलीकडे असते त्या वेळी आपण चक्रावून जातो आणि स्वतःला शहाणे समजून, निसर्गाला चक्रम म्हणू लागतो. वरीलप्रमाणे अगदी चुकीचा प्रश्न विचारू लागतो. असा प्रश्न करून न थांबता आपल्या बुद्धीपलीकडचे काहीतरी शोधून ते बुद्धीच्या आवाक्यात आणण्याचा किंवा बुद्धीचा आवाका वाढवण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच आपल्या शास्त्रीय दृष्टीचा उपयोग जास्त तर्कशुद्ध-दृष्ट्याकरून अशा चक्रम वाटणाऱ्या निसर्गलीलेचा अर्थ लावणे. पृथ्वीतलावर अशाच एका चक्रम वागणूक दाखवणाऱ्या स्थलाचा आपण या दृष्टीने मागोवा घेणे आवश्यक आहे.

या स्थलाला ‘ ओरेगॉन व्होर्टेक्स ’ असे नांव आहे. ओरेगॉन-जवळील ग्रॅन्ट खिडीजवळ सारडाइन क्रीकच्या काठावर हा प्रदेश आहे. या स्थलात निसर्गाचे चक्रम वागणे अगदी सुस्पष्ट दिसते. पण तो तसे का व कसे वागतो याचे मात्र शास्त्रीय स्पष्टीकरण अजून सापडले नाही.

या स्थलाचा व्यास सुमारे १६५ फूट असून ते साधारणतः वर्तुळाकार आहे. पण उपकरणांच्या साहाय्याने असे आढळून आले आहे की, या स्थलाचा आकार नव्वद दिवसांच्या अंतराने सारखा थोडा थोडा बदलतो. या जागेत एक लहानशी लाकडी खोपटी आहे. या खोपटीत सन १८९० पूर्वी एक छोटीशी कचेरी होती. पण जेव्हा निसर्गाच्या चक्रम लीला इथे दिसू लागल्या तेव्हा तेथून ती कचेरी हलविली गेली. आता ती खोपटी मोकळीच आहे. मुळात ही खोपटी या स्थळाच्या बाहेर ४० फूट दूर असलेल्या एका छोटयाशा टेकाडावर होती. पण आता टेकाडाचा तो भाग घसरून ती खोपटी या चक्रम जागेत येऊन बसली आहे. ही खोपटी अगदीच वेडीवाकडी झाली आहे. कदाचित टेकाड घसरण्याचा किंवा या जागेतील निसर्गाच्या चक्रमपणाचा हा परिणाम असेल.

या खोपटीत तुम्ही शिरलात तर तुम्हाला अगदी वेगळ्याच जगात येऊन पडल्यासारखे वाटेल. तुम्ही फार जबरदस्त शक्तीने जमिनीकडे खेचले जात आहात असे तुम्हाला वाटेल. जणू काही गुरुत्वाकर्षण एकदम तीव्र झाले आहे असा भास होईल. तुम्ही आपोआप त्या जागेच्या केंद्राकडे जमिनीशी ऐंशी अंशाचा कोन करून झुकाल. तुम्ही त्या जागेच्या परीघाकडे झुकाल तर तुम्हाला अशी तीव्र जाणीव होईल की, तुम्ही त्या जागेच्या केंद्राकडे

अत्यंत तीव्र शक्तीने खेचले जात आहात. प्रत्यक्ष उपकरणावरील नोंद तुम्हाला तुमची जाणीव खरी आहे असेच दाखवील.

पुष्कळशा शास्त्रज्ञांनी या जागेच्या चक्रम वागणुकीचे कोडे उलगडण्यासाठी अनेक शास्त्रीय प्रयोग केले. त्या खोपटीच्या तुळईला त्यांनी एक अठ्ठावीस पौंडी लोखंडाचा गोळा टांगला. तो गोळा पृथ्वीच्या पृष्ठभागाशी लंबरूपात टांगलेला न राहता काही एक कोन करून टांगलेला राहतो आणि गुरुत्वाकर्षणाच्या सर्व नियमांना हरताळ फासतो. तो त्या जागेच्या केंद्राकडे खेचला जातो हे स्पष्ट दिसून येते. त्याला केंद्राच्या बाजूला ढकलणे सोपे आहे पण परीघाच्या बाजूला ढकलणे अवघड आहे असे तुम्हाला आढळून येईल.

सिगारेटचा धूरसुद्धा या जागेच्या चक्रमपणाला बळी पडल्याचे तुम्हाला आढळून येईल. तुम्ही जर सिगारेटच्या धुराचा लोट हवेत सोडलात तर तो हळुहळू चक्राकार गतीत फिरू लागेल. ही गती हळुहळू वाढून शेवटी हवेत तो धूर हवेत विरून जाईल.

एखादा रिकामा काचेचा ग्लास जर जमिनीच्या पृष्ठभागाशी उतरत्या लाकडी फळीवर ठेवला तर तो खाली घरंगळण्याऐवजी वरच चढत जातो. एखादा हलका रबरी चेंडू अथवा कचकड्याचा चेंडू सपाट जमिनीवर ठेवला तर तो त्या जागेच्या केंद्राकडे आपो-आप घरंगळत जातो. कागदाचे कपटे जर हवेत उधळले तर ते चक्राकार गतीने आपोआप फिरू लागतात. हे सारे पाहून त्या जुनाट खोपटीत उगीचच भुताटकीचा भास होतो.

रेड इंडियन लोकांना या जागेची ही चक्रम वागणूक अगदी चांगली माहीत होती, आणि गोऱ्या वसाहतवाल्यांना त्यांनी 'ही

जागा शापीत आहे" असे सांगितले होते. गोऱ्या लोकांनी त्यांच्या जन्मजात स्वभावाप्रमाणे या जागेच्या चक्रम वागणुकीचा शास्त्रीय अर्थ लावण्याचा प्रयत्न चालू केला आणि तो आजतागायत चालूच आहे. अजून समाधानकारक स्पष्टीकरण सापडत नाही.

अजब कल्पनाशक्तीच्या खेळाने मांडलेला हा दृष्टिभ्रम आहे का ? नाही. हे सारे प्रत्यक्ष घडते आहे. उपकरणांच्या साहाय्याने या जागेचे क्षेत्रफळ शास्त्रज्ञांनी काढले आहे. ही जागा साधारणपणे १६५ फूट व्यासाची आहे. या जागेच्या बाहेर उपकरणांच्या साहाय्याने निरीक्षण केले असताना असे दिसले आहे की या जागेतच केवळ निसर्ग चक्रमासारखा वागतो.

एखादा सोटा किंवा धातूची कांब जमिनीवर उभी करायला जमिनीशी कोन करून उभी करावी लागते.

या जागेत अशी निसर्गाची चक्रम वागणूक दाखविणारी शक्ती विद्युत्चुंबकीय जातीची आहे हे अगदी उपकरणांनी सिद्ध करून दाखविता येते.

छायालेखकाचा प्रकाशमापक वापरला तर वरील गोष्ट सहज सिद्ध करता येईल. या प्रकाशमापकात प्रकाशाचे विद्युत्-शक्तीत रूपांतर होते आणि ते दर्शक तबकडीवर दाखविले जाते. दिवसा प्रकाशाची वागणूक या जागेत आणि जागेच्या बाहेर निरनिराळी आहे असे दिसून येते. होकायंत्रे तर कामच देईनाशी होतात.

तुम्ही घोड्यावर बसून भरधाव या जागेकडे आलात तर घोडा एकदम या जागेला वळसा घालू पाहील. जलदगतीने उडणारे पक्षी या जागेजवळ आले की झपाट्याने वळून निघून जातात.

या जागेतील झाडेसुद्धा इथल्या चक्रमपणाला बळी पडतात. ती धडधडीत वाकतात आणि दक्षिणेकडे झुकतात. आणि या जागे-बाहेर असणारी झाडे सरळ उभी असतात.

हे सारे या जागेतच का घडते ? हे घडविणारी तीव्र शक्ती विद्युत्चुंबकीय जातीची आहे हे निश्चित झाले असले तरी तिचा प्रभाव याच जागी इतका तीव्र का ? हे शास्त्रीय प्रश्नचिन्ह अजून अनुत्तरीतच आहे.

याच जातीची चक्रम जागा या ओरेगॉन व्होर्टेक्सपासून सुमारे पंचेचाळीस मैलांवर सिस्कियू डोंगरात आहे. त्याचप्रमाणे कोलोरॅडो येथे कॅम्पबर्चजवळ अशीच एक आगळी वागणूक दाख-विणारी जागा आहे. अर्थात या दोन जागी चक्रमपणाची तीव्रता ओरेगॉन व्होर्टेक्स या जागेपेक्षा कमी आहे.

या जागांच्या या जगावेगळ्या वागणुकीचे शास्त्रीय स्पष्टी-करण कुणी सुचवू शकेल का ? पाहा प्रयत्न करून.

✦ ✦ ✦

# ४. स्वप्नांची गुप्तहेरगिरी

शेर्लाक होम्सचे नाव गुप्तहेर म्हणून माहीत नाही असा एकही इंग्रजी माणूस नाही. सर आर्थर कॉनन डॉइलने निर्माण केलेली ही काल्पनिक व्यक्तिरेखा काही सत्यसृष्टीतल्या व्यक्तींच्या स्वभाव-वैशिष्टयांच्या मिश्रणाने निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यावर अनेकजणांची भाष्ये चालू आहेत, संशोधन चालू आहे. होम्सने हे सततच दाखवून दिले की, कुठलाही गुन्हा शिक्षेविना सुटत नाही. होम्सच्या निरीक्षण-निष्कर्ष पद्धतीची स्वतः डॉईलनेच काही गुन्ह्यांचा तपास करताना झलक दाखविली; आणि काल्पनिक व्यक्तिरेखा ही सत्यसृष्टीच्या जवळपास आणून ठेवली. कल्पना इतकी सत्यवत् असू शकते, तसेच सत्यही कधीकधी कल्पनेपेक्षाही अद्‌भुत असते. कारण तसे नसते तर स्वप्नात खुनी पकडल्याची घटना घडून शास्त्रज्ञ चक्रावून गेले नसते. या घटनेला मानसशास्त्र-दृष्टचा स्पष्टीकरण असेलही. पण अजून पूर्ण प्रकाश पाडण्याइतके ते समर्थ ठरलेले दिसत नाही.

हॅम्लेट नाटकात हॅम्लेटच्या बापाच्या समंधाने आपल्या खुनाची जी हृदयद्रावक हकीकत सांगितली आहे, ती वरवर पाहणाराला भाकडकथा वाटेल यात संशय नाही. कारण पिशाच्चसृष्टी आहे की नाही याबद्दलच अजून वाद आहे. तेव्हा समंध येईल कसा, तो बोलेल कसा इत्यादी प्रश्न उद्‌भवणे साहाजिकच आहे. पण इंग्लंडमध्ये पोलस्टेड येथे घडलेल्या गोष्टीमुळे अनेक प्रश्न पुन्हा विचारार्थ पुढे आणणे आवश्यक वाटते.

पोलस्टेड येथे मेरिया मार्टिन म्हणून एक बेलदाराची मुलगी होती. ती सुस्वरूप आणि सुस्वभावी होती. त्याच गावाजवळ कोरडर नावाचा एक श्रीमान शेतकऱ्याचा मुलगा राहात असे. कोरडरचे मेरियावर मन गेले. पण ती हलक्या जातीची होती म्हणून तिच्याशी उघड रीतीने त्याला विवाह करता येईना. एक दिवशी मेरिया अचानक नाहीशी झाली. मेरियाच्या आईला तिचे काय झाले ते कळेना. तिने मेरियाचा शोध चालू केला. काही दिवसांनी तिची पत्रे येऊ लागली. पण त्यावर मुक्काम भलताच आणि पोस्टाचा छाप मात्र लंडनचा असे. शिवाय हस्ताक्षरही थोडे वेगळेच दिसे. मेरियाच्या आईस त्यामुळे फार काळजी उत्पन्न झाली. ती झुरणीला लागली.

एक दिवस रात्री मेरिया आईच्या स्वप्नात आली आणि म्हणाली, ‘ कोरडरने मला गोळी घालून ठार मारले आणि माझे शव रेडबोर्न येथे पुरून ठेवले आहे. ’ इतके सांगून स्वप्नातच त्या मुलीने आपल्या आईला रेडबोर्न येथे नेऊन ती जागा दाखवली.

सकाळी आई जागी झाली आणि सर्वांना आपल्या स्वप्नाची हकीकत तिने सांगितली. त्या सर्वांनी, हकीकत खरीच असावी, असे अनुमान काढले. एका मुलाने कोरडरला भरलेली बंदूक घेऊन जाताना पाहिल्याची आणि त्याबद्दल त्याच्याशी बातचीत केल्याची साक्ष दिली. मेरियाचा बाप म्हणाला की, रेडबोर्न येथील पीक कापणीच्या वेळी काही भाग स्वतः कोरडरने आग्रहपूर्वक कापला.

असा संशय बळकट करणारा पुरावा मिळाल्यावर सर्व मंडळी मेरियाच्या आईस घेऊन रेडबोर्नला गेली. तिला मेरियाने स्वप्नात जी जागा दाखवली ती शोधून काढून तिथे त्यांनी

उकरून पाहिले. मेरियाचे शव मिळाल्यावर कोरडरला अचानक पकडून त्याला जाब विचारला. त्याने मुकाट्याने आपला गुन्हा कबूल केला.

डब्लिन पेनी नावाच्या एका मासिकात एक सत्यकथा छापली आहे ती अशी :

डब्लिन शहरात युलिक मागायर नावाचा एक श्रीमान शेतकरी राहात होता. त्याचे ज्या स्त्रीशी लग्न ठरले होते, तिच्याशी लग्न करण्याची ओफल्यागोन नावाच्या एका माणसाची फार इच्छा होती. पण त्या स्त्रीने शेवटी युलिकाशीच लग्न केले. एक दिवस रात्री त्या स्त्रीला एक स्वप्न पडले. त्या स्वप्नात ओफल्यागोनने युलिकाचा – तिच्या पतीचा – खून केल्याचा प्रसंग तिला दिसला. तिने ते स्वप्न आपल्या एका जिवलग शेजारणीला सांगितले. युलिकाचा एक भाचा होता. तो वेडा होता, अगदी जन्मापासून वेडा. तो भ्रमिष्टासारखा, खुळ्यासारखा काहीही बडबडे. युलिकाच्या बायकोने आपले भयानक स्वप्न शेजारणीस सांगितले न सांगितले तोच हा वेडा तिथे गेला आणि शेजारणी-समोर वेड्याविद्र्या स्वरात आडवेतिडवे नाचत एक गाणे गाऊ लागला. त्यात ओफल्यागोनने युलिकाचा खून केल्याचीच कथा होती. स्वप्नाचा वृत्तान्त त्या वेड्याला मुळीच माहिती नव्हता. गाण्याचे सामर्थ्यही नव्हते.

दुसऱ्या दिवशी खरोखरच ओफल्यागोनने युलिकाचा खून केला आणि त्यास दूरवर नेऊन पुरून टाकले. युलिकाचा वेडा भाचा दुसऱ्या दिवशी सकाळच्या प्रहरी झोपेतून ओरडतच उठला आणि पाचपन्नास लोक जमा करून त्याने त्यास खनाची इत्थंभूत

हकीकत एखाद्या शहाण्या माणसासारखी सांगितली. आणि सर्वांना प्रेत पुरलेल्या जागी नेऊन प्रेत उकरून काढले. ओफ्ल्या-गोनला अटक झाली. न्यायाधिशाने त्याला देहान्ताची सजा दिली. प्राणांतसमयी त्याने आपला गुन्हा शांतपणे मान्य केला. इसवी सन सोळाशे पाचमध्ये याच धर्तीचा आणखी एक प्रसंग पॅरिस शहरात घडला.

जॉन स्टॉक्टन हा पॅरिस शहरातील गब्स्ट्रीटवरील एका खानावळीचा मालक होता. तो सडाफटिंग होता. डिसेंबरच्या तेवीस तारखेला कुणा चोरट्यांनी त्याचे घर फोडले आणि त्याचा खून केला. पोलीसांनी खूप तपास केला पण गुन्हेगाराचा तपास लागला नाही. या घटनेला बरेच दिवस झाले. ग्रीनवुड नावाची एक स्त्री त्याच शहरात असे. ती या खानावळवाल्याची पूर्वीची शेजारीण होती. तिच्या स्वप्नात हा खानावळवाला जॉन स्टॉक्टन आला. त्याने तिला स्वप्नातच जॉर्ज स्ट्रीटवरील थॉमस नावाच्या मनुष्याच्या घरी नेले; आणि तिला म्हणाला, 'माझा खून दोघांनी केला. एकाचे नाव मार्श आणि दुसऱ्याचे नाव बीव्हल. मार्श या घरात राहतो. पोलिसांना आणून मार्शला तू अटक करव. हे घर नीट ध्यानात ठेव.'

ग्रीनवुड सकाळी जागी झाली. तिने हे स्वप्न पोलीस अंमलदाराला सांगितले. त्याने ग्रीनवुड हिला बरोबर घेऊन तिने दाखवलेल्या घरात मार्शचा तपास केला. परंतु घराच्या मालकाने सांगितले की 'मार्श नावाचा गृहस्थ पूर्वी येथे राहात होता. पण त्याला येथून जाऊन बरीच वर्षे झाली. तो कुठे गेला याचा काही पत्ता नाही.' पोलिसांची निराशा झाली. ग्रीनवुडने हे घर स्वप्नातच पहिल्यांदा पाहिले होते. मार्शला तिने पाहिलेच नव्हते. त्याचे

नावसुद्धा तिला स्वप्नातच कळले. खरे म्हणजे मार्श नाव बदलून त्याच घरात राहिला होता. आपला सुगावा अकस्मात लागलेला पाहून तो त्याच दिवशी तिथून निघाला आणि दुसऱ्या एका दूरच्या घरात जाऊन राहिला.

ग्रीनवुड घरी आल्यावर त्याच रात्री जॉन स्टॉक्टन पुन्हा तिच्या स्वप्नात आला. त्याने तिला मार्शच्या नव्या घरात नेले, आणि सांगितले की, 'मार्श नाव बदलून आजच या घरात राहायला आला आहे. उद्या तू पोलिसांना घेऊन ये. पोलीस आलेले पाहून तो मागील दाराने जाऊन गाडीच्या पुढच्या पेटीत दडून बसेल. तिथे जाऊन त्याला अटक करव.' इतके सांगून तिला जॉनने प्रत्यक्ष मार्श ही व्यक्ती दाखवली. त्याच्या उजव्या गालावर एक चामखिळ होता तो दाखवून, 'ही चामखिळीची खूण नीट ध्यानात ठेव' म्हणून त्याने तिला ताकीद दिली.

ग्रीनवुडने स्वप्नातली सर्व हकीकत पोलिसांना कळवली. पुन्हा सारेजण ग्रीनवुडने स्वप्नात पाहिलेल्या मार्शच्या नव्या घरी गेले. त्यांना पाहून मार्श खरोखरच मागील दाराने जाऊन गाडीच्या पेटीत दडला. प्रथम पोलिसांनी घरात चौकशी केली. पण पत्ता लागेना. मग ते 'जॉनने ग्रीनवुडच्या स्वप्नात सांगितल्याप्रमाणे' गाडीकडे गेले आणि त्यांनी गाडीची पेटी उघडली. मार्श पोटाशी पाय घेऊन पडलेला त्यांना आढळला. त्याला अटक करून पोलिसांनी चौकीवर नेले. त्याने आपला अपराध कबूल केला. 'आपला साथीदार बीव्हल होता. पण तो कुठे गेला हे काही मला ठाऊक नाही,' असे तो म्हणाला.

त्याच रात्री जॉनचा समंध पुन्हा ग्रीनवुडच्या स्वप्नात आला. मार्शला पकडून दिल्याबद्दल त्या समंधाने तिचे आभार

मानले. नंतर तिला त्याने स्वप्नातच पॅरिस ब्रिजवरील एका अनोळखी झोपडीत नेले. तिथे एक बाई बसली होती. तिला दाखवून जॉनचा समंध म्हणाला, 'ही बीव्हलची बायको ध्यानात ठेव.' नंतर आतल्या खोलीत नेऊन त्याने बीव्हल कोण ते तिला दाखवले.

दुसऱ्या दिवशी ग्रीनवुड पोलिसांना घेऊन बीव्हलला पकडायला निघाली. स्वप्नात पाहिलेल्या घराशी नेऊन बाहेरच बसलेली बाई दाखवून ती म्हणाली, 'ही बीव्हलची बायको'. पोलिसांनी घरात शिरून बीव्हलला घराबाहेर काढले. आणि ग्रीनवुडला विचारले, 'हाच ना तुम्ही स्वप्नात पाहिलेला मनुष्य?'


ग्रीनवुड म्हणाली, 'होय हाच ! मात्र स्वप्नात याचा अंगरखा काळा होता. आता पांढरा आहे. इतकाच फरक.'

इतका पुरावा मिळाल्यावर बीव्हला अटक करून पोलिसांनी त्याला न्यायाधीशापुढे उभे केले. त्यानेही गुन्हा मान्य केला. शेवटी मार्श आणि बीव्हल या दोघांनाही देहान्ताची शिक्षा झाली.

स्वप्नांनीच गुन्हा उजेडात आणण्यासाठी गुप्तहेरगिरी केल्याची ही उदाहरणे पाहून शास्त्रज्ञही चक्रावून गेले आहेत. या घटनांची शास्त्रोक्त स्पष्टीकरणे शोधण्याचे प्रयत्न तेव्हापासून जरी नाही तरी अलीकडे जास्त तीव्रतेने चालू आहेत. पण ही ज्ञानवापी फारच खोल आहे असे दिसते. तेव्हा अजून तरी या घटना म्हणजे शास्त्रज्ञांपुढील प्रश्नचिन्हेच आहेत.

✦ ✦ ✦

# ५. निरभ्र आकाशातून हिमशिलाची वृष्टी



१० नोव्हेंबर १९५० रोजी उत्तर डेव्हन आणि सॉमरसेट येथील ब्रिस्टल खाडीजवळच्या एका प्रचंड मैदानावर एक अभूतपूर्व प्रकार घडला. हा प्रदेश लोकरीच्या उत्पादनासाठी फार प्रसिद्ध आहे. मेंढ्यांचा कळप वाळगून लोकरीचा व्यापार करणारा एडवर्ड लॅथम याला रात्री त्याचा मेंढ्यांचा राखणदार कुत्रा अगदी आकांत केल्यासारखा भुंकत असलेला ऐकू आला. काय भानगड आहे म्हणून लॅथम उठून बाहेर आला. काहीतरी विशेष कारण असल्याशिवाय त्याचा कुत्रा इतक्या जोराने भुंकत नसे.

आकाश निरभ्र होते आणि हवेत गारठा होता. मैदानावरून गार वाऱ्याचा सोसाटा त्याच्या उबदार कपड्यातूनही त्याला जाणवत होता. लॅथमला वाटले की विशेष काही नसावे. कुत्रा बहुधा मधून मधून जोराने भुंकून पहाऱ्याचे काम चोख बजावीत असावा.

पण सकाळी लॅथम उठून पहातो तो, त्याचा कुत्रा पुन्हा रात्रीसारखाच तावातावाने भुंकत होता. त्याच्या झोपडीपासून सुमारे शंभर पावलांवर भुंकत उभ्या असलेल्या त्या कुत्र्याजवळ जाऊन लॅथमने पाहिले, तो काय आश्चर्य ! त्याचे एक मेंढरू त्या ठिकाणी मरून पडले होते. एखाद्या कुऱ्हाडीने खांद्यावर आणि मानेवर घाव घालावा अशी प्राणांतिक जखम त्या मेंढराला झाली होती. त्या मेंढराच्या मृतदेहाजवळच वर्फाचा एक भला मोठा तुकडा पडलेला होता. त्याने नंतर त्या तुकड्याचे वजन केले ते चवदा पौंड भरले. तो वर्फाचा तुकडा इतक्या वेगाने जमिनीवर पडला होता की तो जवळजवळ आठ इंच जमिनीत घुसला होता.

लॅथमने ही गोष्ट हवामान अधिकाऱ्यांना सांगितली. विजेच्या तडाख्याने मरावे असे त्याचे मेंढरू तडकाफडकी गतप्राण

झाले होते. त्या मैदानावर आणि त्याच्या बाजूच्या रस्त्यावरही बर्फाचे मोठमोठाले, बरेचसे तुकडे त्याला आढळून आले. इतके मोठे तुकडे आकाशातून पडल्याचे त्याने कधीच पाहिले नव्हते.

याबाबत भरपूर चौकशी आणि संशोधन केल्यावर 'आपण तर गोंधळून गेलो बुवा', अशी ब्रिटिश हवामानखात्याने स्पष्ट कबुली दिली.

'ते बर्फाचे तुकडे विमानाने टाकले नव्हते अगर वादळामुळे तिथे येऊन पडले नव्हते, त्याचप्रमाणे सर्वसाधारणतः त्या दिवशी असलेल्या हवामानात घडू शकेल अशीही ती गोष्ट नव्हती.' असे त्या खात्याने जाहीर केले.

या अभूतपूर्व प्रसंगामुळे जनतेत उडालेली खळबळ शांत होते न होते तोच २४ नोव्हेंबर १९५० रोजी पूर्वरात्री पुन्हा तसाच प्रसंग घडला.

लंडनजवळील वॅन्ड्स्वर्थ येथील एका गॅरेजचे छप्पर फोडून, एक घनफूट आकाराचा बर्फाचा तुकडा दाणदिशी जमिनीवर पडला. त्याच्या आवाजाने तेथील रात्रीचा पहारेकरी घाबरून जागा झाला. त्याने पोलिसाला बोलावले आणि 'गॅरेजमध्ये बॉंबचा स्फोट झाला' अशी वर्दी त्याने पोलिसाजवळ दिली.

हवामानखात्याला अत्यंत शास्त्रीय पद्धतीने संशोधन करूनही या आगंतुक आणि ना आगा ना पीछा असणाऱ्या हिमशिळेचे कोडे सुटले नाही.

१९५८ च्या एप्रिल महिन्याच्या मध्यावर, कॅलिफोर्निआ येथे नापामधील श्री. लिओ कोझलोव्हस्की या सद्गृहस्थांच्या घराच्या अंगणात अशीच बर्फवृष्टी झाली. दोन इंचांपासून बारा

इंचांपर्यंत व्यास असलेले बर्फाचे तुकडे निरभ्र आकाशातून सपाटयाने जमिनीकडे आले आणि जमिनीत चार-चार, पाच-पाच इंच आत घुसून बसले. त्या वेळी आकाशात एकही विमान हिंडत नव्हते. मग हे आले कुठून हे प्रश्नचिन्ह शास्त्रज्ञांना सतावू लागले.

पेन्सिल्व्हानिया येथे रिडींगजवळ एड्विन ग्रॉफ या शेतकऱ्याला असाच एक चमत्कारिक प्रकार पाहायला मिळाला. तो आपल्या घराजवळ उभा असताना त्याने जोरात शिट्टी वाजल्याचा आवाज ऐकला आणि क्षणभरानेच पन्नास पौंड वजनाचा आणि दोन फूट व्यासाचा असा एक बर्फाचा तुकडा आकाशातून दाणदिशी जमिनीवर येऊन आदळला. ग्रॉफने आपल्या बायकोला बोलावून तो दाखवला. ती दोघे आश्चर्याने हिमशिळेकडे बघत उभी राहिली. तेवढ्यात आणखी एक जवळजवळ तेवढाच बर्फाचा तुकडा पहिल्यासारखाच आकाशातून येऊन जमिनीवर दणकला.

ग्रॉफने शेरीफला बोलावले आणि शेरीफाने हवाई खात्याला पाचारण केले. त्या खात्याने हवामानतज्ज्ञांना बोलावणे पाठविले. 'वाऱ्याच्या सोसाट्यात उडून येऊन पडलेले हे बर्फाचे तुकडे असावेत' असा त्यांनी निर्णय दिला. पण हा निर्णय शास्त्रीयदृष्ट्याही चुकीचा ठरला. कारण कितीही सोसाट्याचा वारा झाला तरी येवढे मोठे बर्फाचे तुकडे उडून येणे शक्य नाही, असे इतर शास्त्रज्ञांनी सिद्ध केले. हा प्रकार ३० जुलै १९५७ रोजी घडला. पेन्सिल्व्हानियातील गोवेन शहरात १४ ऑगस्टला या प्रकाराची पुनरावृत्ती झाली. आणि त्याच प्रांतातील चेस्टरमधील उत्तरेकडील भागातील तिसऱ्या रस्त्यावर ५१० क्रमांकाच्या एका दुकानाच्या छपराला भगदाड पाडून एक प्रचंड बर्फाचा तुकडा

आकाशातून दुकानाच्या जमिनीवर दणकला (८ सप्टेंबर १९५८). या साऱ्या प्रकारांना शास्त्रीय स्पष्टीकरण सापडेचना.

२ सप्टेंबर १९५८ रोजी रात्री न्यू जेर्सीत असाच एक प्रकार घडला. श्री. व सौ. डॉमिनिक बॅसिगॅलुपो हे ओल्ड ब्रिज येथे ग्रेस्टोन रस्त्यावरील ३३६ क्रमांकाच्या घरात होते. ते रात्री ९ वाजता टेलिव्हिजनचा कार्यक्रम बघत आपल्या खोलीत बसले होते. थोड्या वेळाने श्री. बॅसिगॅलुपो स्वयंपाकगृहात कॉफी तयार करण्यासाठी म्हणून गेले. आणि परत येऊन पुन्हा टेलिव्हिजन कार्यक्रम पहायला बसतात न बसतात तोच स्वयंपाकगृहात प्रचंड आवाज झाला. ते जाऊन पाहतात तो काय? एक मोठा बर्फाचा तुकडा आकाशातून येऊन छपराला तीन फुटाचे भगदाड पाडून स्वयंपाकगृहाच्या जमिनीवर दाणदिशी आपटला होता.

इतर ठिकाणी घडलेल्या प्रकाराप्रमाणेच याही प्रकाराच्या बाबतीत शास्त्रज्ञांची वाचा बंद झाली.

ब्रिटिश हवामान खात्याच्या मते, 'या शतकातील महान् शास्त्रीय रहस्य,' म्हणून या प्रकाराची नोंद झाली आहे.

✦ ✦ ✦

# ६. चमत्कारिक भ्रमिष्टपणा

हे एक मानसशास्त्रीय प्रश्नचिन्हच.

चित्तविभ्रम हा एक विलक्षण मानसिक रोग आहे. आता मानसशास्त्रात अमाप प्रगती झाली आहे हे तर खरेच, पण तरीही चित्तविभ्रमातली विविधता पाहिली आणि त्याची स्पष्टीकरणे शोधण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञ करू लागले म्हणजे आजपर्यंत अज्ञात असे एकादे मानसशास्त्राचे नवेच दालन आढळते.

डॉक्टर वाडु याने असे म्हटले आहे की 'आपण काचेचे बनलेले आहोत असा भ्रम झालेले असे अनेक रोगी आहेत. मला एक रोगी तर असा भेटला की तो म्हणायचा, 'मला वाटते की माझा देह मातीचा बनवलेला आहे.' या कल्पनेने तो फार दुःखी होता. शेवटी एका बड्या गृहस्थाने या माणसावर काही उपाय-योजना करावी म्हणून मला बोलावले. घडी, बंधन आणि प्लास्टर मारून त्याच्यावर उपाय केले. त्यामुळे त्याच्यावर अनुकूल परिणाम होऊन तो रोगमुक्त झाल्याचेही त्याच्या बोलण्यावरून जाणवले. पण या औषधोपचाराने तो खूष न होता, उलट दुष्ट, भांडखोर आणि किरकिऱ्या बनला. हा बदल त्याच्या स्वभावात का झाला याचे कोडे उलगडले ते त्याच्या गड्याने. तो गडी म्हणाला, 'आता त्या रोग्याच्या मनात भरले आहे की आपण मातीचे भांडे आहोत.'

वॉटस् नावाच्या एका प्रख्यात डॉक्टरलासुद्धा मरण्यापूर्वी चित्तविभ्रमाने पछाडले होते. तो शरीराने लहानसरच होता. पण

त्याला भ्रम झाला की आपले शरीर बाहेर जाण्यायेवढा दरवाजाच आपल्या घराला नाही.

डॉक्टर मिलेंजन यांना एक रोगी भेटला होता. तो कशासही आपले अंग लागू देत नसे. याचे कारण त्याला विचारले असता तो म्हणाला म्हणे, 'वा: वा: ! मी कशासही माझे अंग लागू देणार नाही. कारण मी एक नाजूक कांचेचे भांडे आहे, याबद्दल संशय नाही. म्हणून मी कधी खाली बसत नाही. जाता-येता, बसता मला जरा जरी धक्का लागला तर मी फुटून नाही का जाणार ?'

याच डॉक्टरला दुसरा एक रोगी भेटला. तो म्हणायचा, 'हे पहा डॉक्टरसाहेब माझ्या डोक्याची कवटी रिकामी आहे, तीत मेंदू वगैरे काही नाही.'

एका अमेरिकन विद्वान गृहस्थाला वेस्ट इंडीजच्या वसाहतीत न्यायाधिशाची जागा मिळाली होती. त्याला पुढे असे वाटू लागले होते की आपणाला कासवाचे रूप प्राप्त झाले आहे.

गरिंजन येथे राहणाऱ्या डॉक्टर वॉल्डर स्टाइन याने आपल्या डायरीत एका कुरूप विद्वानाची हकीकत लिहिली आहे. या विद्वानाला कायम असे वाटत असे की आपल्यावर काहीतरी अरिष्ट कोसळले आहे. त्यामुळे तो तळमळत राहात असे. एकदा चांगला शुद्धीवर असतानाच त्याला ओळीने तीन वेळा शिंक आली. तरीही आपल्याला शिंक येत नाही म्हणून तो रडत बसला होता. दुसऱ्या एका वेळी त्याला वाटले की आपल्या घरास आग लागली आहे; आणि त्याच्या ठिणग्या आपल्या अंगावर पडून आपले अंग होरपळत आहे. हा सर्व आपल्या मनाचा खेळ आहे हे समजत

असूनही त्याने आगीची घंटा वाजवून लोक जमा केले; आणि भयाने आरडाओरड केली !

डॉ. रश यांच्या रेकॉर्डला एक खटला होता. त्यात एका चित्तविभ्रम झालेल्या माणसाची कथा होती. त्याला वाटत असे की आफ्रिकेतील एक भयानक रानटी प्राणी आपल्या पोटात आहे. त्यामुळे आपल्याला तीव्र वेदना होत आहेत असे तो सांगे. त्याने केप ऑफ गुडहोप येथे असा एक भयंकर प्राणी पाहिला होता.

पिनेलने एका ठिकाणी लिहून ठेवलेले आहे : एका फ्रेंच मनुष्यास असा भ्रम होता की आपले पहिले डोके उडवले आहे आणि आता असलेले हे दुसऱ्याचेच लावलेले आहे, हा त्याचा भ्रम कायमच टिकला.

इक्विरल म्हणतो, ' कित्येक तरुण पुरुषास आपण बायका आहोत असेच वाटते. त्यापैकी एकाने एका प्रेक्षागृहात उत्तम स्त्रीपार्ट करून दाखवला. तो सदोदित बायकांचा पोषाख घालूनच वावरत असे.

डॉक्टर कोनोलीकडे असा एक रोगी होता की त्याला वाटे आपल्याला केव्हाच फाशी देऊन टाकले आहे. आणि आता जो थोडासा जीव उरला आहे, तो केवळ विजेच्या शक्तीमुळे उरलेला आहे. त्याची इच्छा होती की, पूर्ववत् आपण पूर्ण जिवंत व्हावे.

जाकूवी म्हणतो, ' बर्चबर्ग येथे एक चळ लागलेला मनुष्य होता. त्यास असे वाटे की, आपल्या पोटात कोणी एक मनुष्य असून तो आपणाशी बोलत आहे. आणि त्याच विवंचनेत तो नेहमी असे. त्याच्यावर पलिस्तर मारून त्याला बरे केले होते. पण त्याला काही दिवसांनी पुन्हा भ्रम झाला. तो म्हणू लागला, ' आता

दुसरा माणूस पहिल्याच्या जागी पोटात येऊन बसला आहे. तो आता बोलून मला भंडावतो आहे.'

चौदाव्या लुईस राजाच्या दरबारातील एका सरदाराची एक विचित्र हकीकत सरकारी कागदपत्रात लिहिलेली सापडते. त्या सरदाराचा असा ग्रह झाला होता की आपण कुत्रे आहोत. त्याप्रमाणे तो एका खिडकीत बसून रस्त्यातून जाणाऱ्या येणाऱ्यावर भुंकत असे.

डॉक्टर कामेटने एका ठिकाणी म्हटले आहे, 'जर्मनीतील मठात काही संन्याशांना असा भ्रम झाला होता की, आपली शरीरे मांजराची झाली आहेत. ते सर्वजण घराभोवती म्यांव म्यांव करीत हिंडत. मांजरासारखे खाजवत बसत. एकमेकास ओरखाडे घेत. हातावर थुंकी घेऊन अंग व तोंड साफ करीत.'

बोरहाव्ह नावाच्या माणसाने एक गोष्ट लिहिली आहे ती फारच चमत्कारिक आहे. तो म्हणतो, 'एका मनुष्यास, आपले पाय गवताचे आहेत असे वाटत असे. अर्थात त्याचा हा भ्रम चाकराने झाडताना त्याच्या पायावर केरसुणीचा एक रट्टा देईतो-पर्यंतच टिकला.'

चित्तविभ्रमाचे स्पष्टीकरण आधुनिक मानसशास्त्र देण्याचा प्रयत्न करीत आहे. पण तरीही अनेक नवे प्रश्न उद्भवत आहेत. शास्त्रज्ञांपुढील समस्या वाढतच आहेत.

✦ ✦ ✦

# ७. मनुष्य वाऱ्यावरती विरला !



आपल्या पुराणातच नव्हे तर परदेशीय पुराणातसुद्धा डोळ्यासमोर मनुष्य अदृश्य होणे आणि अर्थात तो देवत्व पावला आहे असे म्हणणे या कथा बहुसंख्येने आहेत. आपल्याला अदृश्य रूपाने संचार करता यावा अशी मानवी मनाची आस अमर आहे. त्यातूनच एच्. जी. वेल्स सारख्या प्रतिभावंत लेखकाला 'अदृश्य माणूस' ही विज्ञान नवलकथा स्फुरली असेल आणि अशा तऱ्हेचे खरेच काही पूर्वी असेल का? अगर यापुढे होईल का? हे प्रश्नचिन्ह शास्त्रज्ञांपुढे राहणे अटळ आहे.

आधुनिक काळात भौतिकवादी या अदृश्य होण्याच्या प्रकाराला कविकल्पना म्हणतात, तेही साहजिकच आहे. कारण तसे काही आधुनिक काळात घडले असे कानावर येऊन त्याची शास्त्रीय छाननी केली तर ते बहुतेक वेळा खोटे आहे असेच ठरते. म्हणून भौतिकवादाला धक्का देणारी आणि शास्त्रज्ञांपुढे प्रश्न-चिन्ह उभी करणारी एक सत्यकथा मी तुम्हाला सांगतो.

डेव्हिड लँग नावाचा एक माणूस खरोखरीच त्याचे आप्तेष्ट आणि मित्र यांच्या दृष्टीदेखत वाऱ्यावर विरल्यासारखा बघता बघता अदृश्य झाला खोटे वाटते ना ऐकल्याबरोबर? मग आता सारी हकीकतच ऐका.

त्याचे असे झाले की, अमेरिकेत १८८० साली २३ सप्टेंबर रोजी ही गोष्ट घडली. अगदी भर दुपारी स्वच्छ सूर्य प्रकाशात, आणि बघणाऱ्यांच्या डोळ्यांसमोर निमिषमात्रात.

अमेरिकेत टेनेसी विभागात गॅलेटिनपासून काही मैल अंतरावर डेव्हिड लँग या शेतकऱ्याचे एक शेत होते. जवळच त्याचे लहानसे विटांनी बांधलेले टुमदार घर होते. भिंतींवर द्राक्षांचे वेल सोडले होते. घरासमोरचे कुरण चाळीस एकरांचे होते. उन्हाळ्याचे दिवस होते आणि त्यामुळे गवत वाळून गेले होते.

२३ सप्टेंबर १८८० रोजी दुपारी लँगची अकरा वर्षाची सॅरा आणि आठ वर्षांचा जॉर्ज अशी दोन मुले, लँगने त्यांच्यासाठी त्याच दिवशी नॅशव्हिलहून आणलेली लाकडी घोडागाडी घेऊन, कुरणात खेळत होती.

ती खेळत असताना लँग आणि त्याची बायको घरातून बाहेर आली. सौ. लँग सोप्यात उभे राहून आपल्या नवऱ्याला म्हणाली, 'डेव्हिड ! लौकर परत या, कारण दुकाने बंद होण्याच्या आधी मला गाडीतून शहरात जाऊन यायचे आहे.'

लँग तोपर्यंत आपल्या आवडत्या घोड्यांची देखभाल करावी म्हणून निघून कुरणाभोवतालच्या कुंपणाजवळच्या तबेल्याजवळ पोहोचलाही होता. एक क्षण तो आपल्या घड्याळात वेळ पाहावी

म्हणून थांबला. नंतर हात हालवून म्हणाला, 'मी थोड्या वेळातच परत येतो हं' पण–

पण तो कधी परत आलाच नाही.

लँगच्या बोलण्यानंतर पुढील तीस सेकंदात झपाट्याने पुढील घटना घडल्या. त्या तीस सेकंदांच्या शेवटी लँगचे दृश्य-अस्तित्व नाहीसे झाले.

लँग परत येण्याचे आश्वासन देत असताना कुंपणापलीकडील रस्त्यावरून एक बग्गी चालली होती. ती लँगच्या घराच्या रोखानेच येत होती. जॉर्ज आणि सॅरा यांनी ती बग्गी त्या गावचे न्यायाधीश ऑगस्ट पेक यांची आहे हे ओळखले, कारण पेक-महाशय लँगकडे नेहमी येत असत आणि मुलांना छोटी छोटी खेळणी आणत असत. सौ. लँग आणि स्वतः लँग यांनीही ती बग्गी पाहिली. लँगने हात वर करून पेकमहाशयांना अभिवादन केले आणि कुंपणापासून तो घराकडे परतला, आणि दहाबारा पावले चालून येतो न येतो तोच 'ते नवल वर्तले.' न्यायाधीश पेक, पेक यांचा मेहुणा, सौ. लँग, जॉर्ज आणि सॅरा यांच्या डोळ्यां-देखत लँगचा देह हवेत विरून लँग अदृश्य झाला. मुले बधिर होऊन बघतच राहिली, सौ. लँगनी किंचाळी फोडली. सारीजण ज्या जागी लँग अदृश्य झाला तेथे धावतच आली. त्या जागी लँगचे काय झाले ते दाखविणारी एकही निशाणी नव्हती.

सौ. लँग जवळ जवळ वेड्याच झाल्या. त्यांना कसेबसे घरात नेले. आणि नंतर शेजारीपाजारी आणि इतर काही लोक यांच्या साहाय्याने पेकमहाशयांनी सारे कुरण खणून काढून शोध केला. जमिनीत कोठे भुसभुशीतपणा आढळला की लगेच त्या-

खाली गुप्त गुहा, खोबणी वगैरे आहेत की काय याचा नीट शोध घेतला गेला. पण व्यर्थ. तासन्तास शोध करूनही लँगचा काहीही पत्ता लागला नाही. पेक, पेक यांचा मेहुणा, जॉर्ज, सॅरा आणि सौ. लँग यांच्या डोळ्यांदेखत लँग वाऱ्यावर विरून अदृश्य झाला होता.

पुढील काही दिवसांत सरकारी अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी शांतता प्रस्थापित केली. सौ. लँग अंथरुणाला खिळल्या, घरचे नोकर नोकरी सोडून गेले. फक्त स्वयंपाकीण तेथे राहिली.

पुन्हा एकदा कुरणाची नीट पाहणी केली गेली, पण व्यर्थ ! काहीही उपयोग झाला नाही. कारण कुरणाच्या मातीच्या थराखाली, चुनखडीचा टणक थर आढळला; त्यात खोबणी नव्हत्या, गुहा नव्हत्या. शेवटी लँगचे काय झाले हे प्रश्नचिन्ह शास्त्रज्ञांसमोर कायमच राहिले.

पुढे सौ.लँग सुधारल्या व काही वर्षे जगल्या. कुरण भाड्याने चराईसाठी दिले गेले; त्यावर त्यांचा चरितार्थ चालला.

१८८१ सालच्या एप्रिल महिन्यातील एका दिवशी संध्याकाळी जॉर्ज व सॅरा, लँग ज्या जागी नाहीसा झाला त्या जागेवर असलेल्या वाळक्या गवताभोवती उभी राहिली. सॅराने लँगला साद घातली. लँगची अत्यंत क्षीण आवाजातली मदतीसाठी याचना ऐकू आली आणि पुन्हा सारे स्तब्ध झाले.

खरंच लँगचे झाले होते तरी काय ?

✦ ✦ ✦

# ८. जुन्या काळातील अपूर्व यंत्रकौशल्य

फ्रान्समधील गोष्ट. चौदाव्या लुईस राजाच्या लहानपणची. त्याला खेळण्यासाठी म्हणून एका कामस नावाच्या फ्रेंच कारागिराने काही चित्रे तयार करून आणली होती. त्यात एक गाडी होती. ह्या गाडीमध्ये त्या चतुर कारागिराने अशी काही करामत केली होती, की ती पाहिली म्हणजे त्याच्या बुद्धीचे सर्वांस मोठे आश्चर्य वाटे.

ही गाडी लहानसरच होती. तिला दोन घोडे जुंपलेले होते, गाडीमध्ये एक स्त्री बसलेली होती. गाडीच्या पुढच्या बाजूस एक हुजऱ्या आणि मागच्या बाजूस एक पट्टेवाला होता.

ही गाडी एखाद्या चांगल्या सपाट टेबलाच्या एका कोपऱ्यावर नेऊन ठेवली की, गाडीचा 'कोचमन' – गाडी हाकणारा – चाबुक उगारी. त्यांबरोबर घोडे गाडी घेऊन पळत सुटत. त्या कृत्रिम घोड्यांचे चारही पाय खऱ्या घोड्याप्रमाणे हालत असत. अशा वेगाने ती गाडी, टेबलाच्या दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत गेली, की ती चटकन आडवी व सरळ रेषेत फिरून टेबलाच्या आडव्या कडेबरोबर चालू लागे. असे होता होता शेवटी ज्या टोकावर राजदरबार करून वसवलेला असेल तेथपर्यंत ती गाडी येऊन पोचली, की गाडी लागलीच तेथे थांबे. गाडी थांबली, की पट्टेवाला खाली उतरून गाडीचे दार उघडी. दार उघडले की, ती बाई खाली उतरावयास लागे. इतक्यात पुढे बसलेला हुजऱ्या खाली उतरून बाईस हात देत असे. मग ती बाई मोठ्या सभ्यपणाने आणि नम्रभावाने राजदरबारात जाई. हातात असलेला अर्ज

राजापुढे ठेवी. थोडा वेळ थांबे. नंतर पहिल्याप्रमाणेच मोठ्या इभ्रतीने पुन्हा गाडीपर्यंत येई. गाडीत चढताना हुजऱ्या तिला हात देई. नंतर आपण स्वत: तो पुढच्या बाजूस जाऊन बसे. पट्टेवाला दार बंद करी. कोचमन चाबुक उगारी. लगेच घोडे पळू लागत. मग पट्टेवाला पाठीमागच्या बाजूस हात देऊन क्षणभर गाडीबरोबर पळे आणि मग चटकन उडी मारून, गाडीच्या टपाच्या वाद्यास धरून पाठीमागच्या पायरीवर जाऊन उभा राहात असे. मग घोडे पळत पळत गाडी पूर्वीसारखीच प्रत्येक कोपऱ्यावर वळून पहिल्या जागी येऊन थांबत असे.


इतक्या जुन्या काळात इतके अपूर्व यंत्रकौशल्य आले कुठून ? हे सध्याच्या शास्त्रज्ञांपुढे प्रश्नचिन्हच आहे. आधुनिक काळातसुद्धा अशा रीतीने अगदी खऱ्याचा आभास निर्माण करणारे खेळणे करायला कितीतरी यांत्रिक आटापिटा करावा लागेल. मग जुन्या काळात, युरोपात का होईना, इतकी यंत्रकला कोठून असणार ?

अशी कित्येक कोडी जुन्या काळाने आधुनिक शास्त्रज्ञांपुढे टाकली आहेत. ही प्रश्नचिन्हे सोडवायला संशोधन केले तर आश्चर्यार्थी उद्गारचिन्ह निर्माण होईल असेच वाटते.

✦ ✦ ✦

# १. अशक्य पण घडले आहे.

## (एक रासायनिक भुकटी + पाणी = पेट्रोल)




पेट्रोल भयंकर ज्वालाग्राही, पाणी आग विझविणारे, पेट्रोल स्वतः जळून वाहने चालवते तर पाणी फार तर बाष्परूप होऊन वाहन चालवण्यास मदत करते, पण केवळ एक रासायनिक भुकटी पाण्यात मिसळून पाण्याच्या अगदी विरुद्ध प्रकृतीचे पेट्रोल तयार होऊ शकते हे कसे काय ? अगदी अशक्य, अगदीच अविश्वसनीय असे विचार तुमच्या डोक्यात या लेखाचा मथळा वाचून आले असले, गलबलले असले, तर नवल नाही. पण शास्त्रज्ञांनाही कोडे पडेल असे अद्भुत घडले, हे मात्र खरे.

इसवी सन १९१७ च्या सुरुवाती सुरुवातीला म्हणजे पहिल्या जागतिक महायुद्धात अमेरिकेने अजून पदार्पण केले नव्हते तेव्हा ही अद्भुत हकीकत घडली.

ब्रुकलिन नेव्ही यार्डचे कप्तान आणि वरिष्ठ इंजिनिअर कमांडर अर्ल पी. जेसप यांच्या कचेरीत येण्याबद्दल न्यूयॉर्क

वर्ल्ड या प्रख्यात नियतकालिकाचे कुशल वार्ताहर आरमारवार्ता संपादक वॉल्टर स्कॉट मेरीवेदर यांना एक दिवस आमंत्रण आले.

कमांडर जेसप मेरीवेदर यांना म्हणाले, "मला जे काही शास्त्रीय आणि तांत्रिक ज्ञान आहे ते मला सारखे बजावते आहे की, तू नुकतेच जे पाहिलेस ते अगदी अशक्य आहे, पण ते अद्भुत मी पाहिले आहे. खरे जे पाहिले आहे त्यावर विश्वास ठेवणे भाग आहे. कारण त्याची चाचणी घेण्यासाठी जी अत्यंत उत्कृष्ट शास्त्रीय उपकरणे मी वापरली, ती काही मला फसविणे शक्य नाही. नुकतीच आम्ही ज्या नव्या शोधाची कसून चाचणी घेतली तो शोध म्हणजे बंदुकीच्या दारूच्या शोधाइतकाच क्रांतिकारक ठरेल."

त्यानंतर कमांडर जेसप यांनी त्या शोधाची हकीकत सांगितली ती अशी :

जॉन अॅन्ड्रयूज नावाचा एक पोर्तुगीज इसम एक दिवस जेसप यांचेकडे आला. तो पेन्सिल्व्हानियामधील मक्कीस्पोर्ट येथे राहात असे. त्याचा दावा असा होता की की, 'मी एक असा पदार्थ शोधून काढला आहे की, तो ताज्या गोड्या अगर खाऱ्या पाण्यात मिसळला तर पेट्रोलसारखाच उपयोगी पडेल असा द्रव तयार होतो. ज्या वाहनांच्या चलनवलनास पेट्रोल आवश्यक आहे त्यांना पेट्रोलऐवजी तो उपयुक्त ठरेल.'

अॅन्ड्रयूज याने आपल्याबरोबर एक लहानशी कातडी पिशवी आणली होती. त्याचे म्हणणे ऐकून त्याला एक पाणी भरलेली बादली आणि एक मोकळा, अगदी नीट तपासून पाहिलेला असा, टिनचा डबा दिला गेला. या दोन्ही वस्तू घेऊन तो आपल्या

मोटारीच्या मागच्या बैठकीच्या जागी गेला. काही क्षणातच तो परत आला. त्याच्या हातात रिकामी बादली होती आणि पाण्यासारख्या दिसणाऱ्या द्रवाने भरलेला टिनचा डबा होता.

कमांडर जेसप यांनी तो द्रव भरलेला टिनचा डबा आरमारी रसायनशाळेत नेला. तो द्रव पदार्थ त्यांनी एका मोटार बोटीच्या पेट्रोलच्या रिकाम्या टाकीत ओतला. जास्त खबरदारी म्हणून अर्धा गॅलन पाणीही त्याचबरोबर त्या टाकीत ओतले.

नंतर मोटारबोट नेहमीच्या पेट्रोलपेक्षा शेकडा ७५ कार्यक्षमतेने काम करू शकली. यावरून अॅन्ड्रचूज याने तयार केलेला द्रव पदार्थ पेट्रोलसारखाच काहीतरी असावा हे निश्चित झाले. तरी आरमार खाते हे मात्र साशंक राहिले आणि त्याच्या अधिकारीवर्गाने अॅन्ड्रचूजला पुन्हा दुसरे दिवशी बोलाविले.

दुसरे दिवशी एका अगदी मोकळ्या काँक्रीटने बांधलेल्या खोलीत त्याला जावयास सांगितले. एका दाराशिवाय त्या खोलीला दुसरा मार्ग नव्हता. खिडकीसुद्धा नव्हती. इतकेच नव्हे तर कुठलाही द्रव पदार्थ ओतून नाहीसा करता येईल अशी मोरीसुद्धा नव्हती. अॅन्ड्रचूजला समुद्राच्या पाण्याने भरलेली एक बादली आणि एक नीट तपासलेला पूर्ण रिकामा टिनचा डबा दिला गेला. काही क्षणांनीच तो खोलीतून बाहेर आला. त्याच्याजवळ रिकामी बादली आणि पेट्रोलसारख्या द्रवाने भरलेला टिनचा डबा होता. त्या द्रवाने पूर्वीसारखेच काम देऊन मोटारबोट चालविली.

आरमारी अधिकारीवर्ग यावर विश्वास ठेवावा की न ठेवावा अशा संभ्रमात पडला. सारी हकीकत अगदी विश्वसनीय अशीच होती, पण त्याबरोबर अशक्यही होती.

शेवटी आरमारी अधिकारीवर्ग काहीच निर्णय घेऊ शकला नाही; आणि अॅन्ड्र्यूज निराश होऊन परत आपल्या गावी म्हणजे मक्कीस्पोर्टला गेला.

काही दिवसांनी आरमारी अधिकारीवर्गाने जोसेफस् डॅनिअलस् या त्यांच्या खात्याच्या कार्यवाहाला अॅन्ड्र्यूजकडे पाठविले. पण आश्चर्य हे की अँड्र्यूजचा पत्ताच लागेना.

अॅन्ड्र्यूज बहुधा ब्रिटिश सरकारशी त्याच्या त्या अद्भुत शोधाच्या पेटंटबद्दल बोलणी करण्यासाठी इंग्लंडला गेला होता. पुढे तेथेही निराश होऊन तो परत आला आणि योगी लोकांचा मार्ग स्वीकारून तो आयुष्य कंठू लागला असे म्हणतात.

जे अद्भुत होते ते मात्र गूढच राहिले. पण जे पाहिले होते आणि घडले होते ते मात्र त्या त्या अधिकारीवर्गाने ठामपणे सत्य होते, असे पुनः पुन्हा सांगितले.

इसवी सन १९४५ मध्ये मेरीवेदर यांचेकडे पुन्हा चौकशी केल्यावरही पूर्वीची सारी हकीगत घडली ती सत्य असेच उत्तर आले.

म्हणजे काय ? या साऱ्या प्रकारात शास्त्रज्ञांपुढे प्रश्नचिन्ह कायमचे उभे आहे ते आहेच.

कोणी आधुनिक शास्त्रज्ञ याचे उत्तर देऊ शकेल काय ?

✦ ✦ ✦

# १०. एक अलौकिक प्रौढबुद्धीचा बालक

इसवी सन सतराशे एकवीस, दिनांक सहा फ़ेब्रुवारी.

लबेक या शहरात ख्रिश्चन हेवेकर नावाचा एक मुलगा जन्माला आला. तो अलौकिकच निघाला. अनेक मी मी म्हणविणाऱ्या शरीरतज्ज्ञांना त्याने आपल्या लोकविलक्षण करामतीने चक्रावून सोडले.

तो दहा महिन्यांचा झाला तेव्हा जे काही त्याच्याशी बोलावे ते सर्व तो पाठ म्हणून दाखवी.

तो जेव्हा बारा महिन्याचा झाला तेव्हा त्याला इतिहासातल्या काही गोष्टी तोंडपाठ येऊ लागल्या. दोन वर्षांचा व्हायच्या आत त्याने सर्व बायबल आणि इतिहास मुखोद्गत केला. तिसऱ्या वर्षी त्याला लॅटिन व फ्रेंच या भाषा येऊ लागल्या. तसेच त्याला सर्व जगाच्या इतिहासातील आणि भूगोलातील बरेच प्रश्न सांगता येऊ लागले.

चवथ्या वर्षी त्याने, धर्मांचा आणि धर्मांच्या इतिहासाचा अभ्यास केला. त्याला जे वाचावे ते पाठ येत असे. वादग्रस्त मुद्द्यांवर तो विचार करून आपले मत्त सांगे.

डेन्मार्कच्या राजाला या लोकविलक्षण मुलास पाहण्याची इच्छा झाली. तेव्हा त्याला कोपनहेगन येथे नेण्यात आले. त्याची कोर्टात परीक्षा पाहण्यात आली. त्यावेळी तो एक जगातले आश्चर्य ठरला. शास्त्रज्ञ या चमत्काराचा वैज्ञानिक अर्थ शोधू लागले.

तो घरी परत आल्यावर लिहावयास शिकू लागला. परंतु प्रकृतीने फारच अशक्त असल्याने आजारी पडला.

इ. स. सतराशे पंचवीसच्या जून सत्तावीस या तारखेस म्हणजे केवळ वयाच्या सुमारे साडेचार वर्षांच्या अल्पकाळातच तो मृत्युमुखी पडला.

मार्टिनी याने इ. स. सतराशे तीसमध्ये लबेक येथेच त्याचे चरित्र लिहून त्याला अजरामर करून ठेवले.

जरा न येता बालवयात आपल्या प्रौढ बुद्धीने अमर नाम झालेल्या या बालकाच्या या लोकविलक्षण बुद्धिविकासामुळे शास्त्रज्ञ त्यावेळी तरी चक्रावून प्रश्नचिन्हांकित मुद्रेने एकमेकाकडे पाहात राहिले.

आधुनिक वैज्ञानिक कदाचित शरीर आणि मनोविज्ञान यांच्या साहाय्याने या चमत्काराचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करतील. हे कसे घडले हेही कळेल. पण का घडले हे प्रश्नचिन्ह कायमच राहील.

◆ ◆ ◆

# ११. ढगांची साठमारी ( झुंज )

मध्यान्ह उलटून गेली होती.

जुलै २८ सन १८७४ या दिवसाची भर दुपार या सृष्टि चमत्काराला साक्ष होती.

पेन्सिल्व्हानियामधील पीटस्बर्गजवळ मिलरन या ठिकाणी शेकडो लोके आश्चर्याने स्तंभित होऊन आकाशाकडे बघत उभे होते.

नैर्ऋत्य दिशेने एक भला मोठा जगडव्याळ काळाकुट्ट ढग क्षितिजावर अवतरला आणि झपाटद्याने आकाशाच्या मंडपीच्या मध्यावर येण्यासाठी निघाला.

तसाच एक मोठा ढग ईशान्येकडून निघाला आणि पहिल्या ढगावर जणू चाल करून गेला

दोन्हीही ढग तांबड्या लाल कडांनी वेष्टिलेले होते. जणू काही दोन प्रचंड काळे हत्ती, तांबड्या लाल फुलांच्या माळा घालून, साठमारीसाठी निघाले होते.

पृथ्वीतलावरील उपरिनिर्दिष्ट स्थळी सारे पामर मानव हा काय चमत्कार आहे म्हणून पहात उभे होते.

ढग, आणि एकमेकांच्या विरुद्ध दिशेने आकाशात धावत येऊ शकतात? छे: शास्त्रीय नियमांच्या विरुद्ध काहीतरी घडते आहे. कारण वातावरणात एकाच उंचीवर असे होऊ शकणार नाही. कारण ढग वाऱ्याच्या प्रवाहाप्रमाणे त्या दिशेने वाहतात आणि एकाच उंचीवर वाऱ्याचे प्रवाह एकमेकांच्या दिशेने विरुद्ध कधीच वाहू शकणार नाहीत. आणि अर्थातच ढग एकमेकांच्या

विरुद्ध दिशेने येऊन एकमेकांवर आदळणार नाहीत. मग हे आक्रीत कसे घडत होते, अगदी ' चक्षुर्वै सत्यम् ' ? शास्त्रज्ञांना याचे उत्तर त्यावेळी सापडले नाही आणि अजूनही सापडत नाही.

घडले ते आक्रीत–काहीतरी अभूतपूर्व होते खरे.

भयचकीत झालेला मनुष्यांचा जमाव त्या युद्धास सिद्ध झालेल्या ढगांच्याकडे डोळे विस्फारून पाहात होता. दोन प्रचंड लढाऊ गलबतेच जणू एकमेकावर चालून जात आहेत असे वाटत होते. हे एकूण युद्धसादृश तंग वातावरण आणखीच तंग व्हायला मदत झाली ती त्या दोन ढगांच्यामध्ये झडणाऱ्या विजेच्या चमचमाटाने. त्या विजेच्या गडगडाटानेच सारी धरणी कंपायमान होत होती. सारेजण देहभान विसरले आणि टक लावून आकाशातील त्या अद्भत दृश्याकडे पहात होते.

त्या ढगांनी जेव्हा एकमेकांना धडक मारली त्या वेळी जवळजवळ अर्धे-मिनिट आकाशात नुसता हल्लकल्लोळ उडाला. ज्यांनी हे प्रत्यक्ष पाहून लिहून ठेवले आहे त्यांच्या सांगण्याप्रमाणे तर आकाश जणू काही फुटते आहे असा भास झाला. थोड्या वेळात तेव्हा चाललेला प्रलयंकारी गडगडाट आणि चमचमाट थांबला आणि मुसळधार पावसाला सुरुवात झाली. आणि थोड्याच वेळात सारे काही भिजून चिंब झाले, महापूर आल्यासारखे पाण्याचे लोट वाहू लागले. घरेदारे, कुंपणे, झाडे, गुरेढोरे, पूल इत्यादी साऱ्यांचा विध्वंस होऊन ते वाहून जाऊ लागले. या दरीत घुसणाऱ्या पाण्याच्या लोटात जवळजवळ दीडशे माणसे दगावली. सगळीकडे नासधूस झाली, हाहा:कार झाला !

या साऱ्या प्रलयातून वाचलेले लोक सांगतात की असा भयंकर आणि सर्वनाशी प्रसंग अभूतपूर्व आहे आणि अद्‌भुतही आहे. असा कधी पूर्वी झाला नाही, आणि पुन्हा होणारही नाही.

पण या प्रलयाचे जनक जे ते काजळी लालपट्टेवाले ढग, ते असे अशास्त्रीय का वागले? त्यांच्या वागणुकीचे शास्त्रीय स्पष्टीकरण काही आहे का? अजूनही ते कोडे शास्त्रज्ञांना उलगडले नाही आणि त्यामुळे शास्त्रज्ञांपुढे ते एक निसर्गाने उभे केलेले प्रश्नचिन्हच आहे. कुणी याचे उत्तर देऊ शकेल काय?

✦ ✦ ✦

# १२. वाढता वाढता वाढे

पुराणांतरीचा हनुमान हा प्रसंगाप्रमाणे आपले शरीर हवे तसे वाढवणारा, अलौकिक, बलशाली पुरुष म्हणून सर्वख्यातच आहे. त्याचे वर्णनच ‘वाढता वाढता वाढे’ असे केलेले आहे.

आधुनिक जगात अगदी हनुमंतासारखी नाही तरी सर्व-साधारण मनुष्य-प्रकृतीपेक्षा आगळी वेगळी वाढ फार थोडया वयात दाखवणारी लोकविलक्षण उदाहरणे आहेत. या माणसांच्या बाबतीत नुसती शारीरिक वाढच नव्हे तर शरीरसामर्थ्यातही वाढ झालेली दृष्टोत्पत्तीस आली आहे.

‘फ्रेंच अकॅडेमी ऑफ सायन्स’ या नावाचे एक शास्त्रसिद्ध पदार्थ-संग्रहालय पॅरिस शहरात होते – किंबहुना आहे. तिथल्या रजिस्टर बुकात एका मनुष्याच्या वाढीबद्दल चमत्कारिक नोंद आहे.

इ. स. सतराशे एकोणतीसमध्ये तेथे एक मनुष्य जन्मास आला. तो सात वर्षांच्या उमरीत आला तेव्हा त्याची उंची पाच फूट झाली. म्हणजे जवळ जवळ मोठ्या मनुष्याच्या उंचीइतकी ती झाली.

हा मुलगा केवळ एरंडासारखा उंचच उंच वाढला असे नाही, तर त्याची शक्तीही त्याच्या वाढीप्रमाणेच होती. तो चार वर्षांचा असताना एका सशक्त मनुष्याच्या ओझ्याचा गवताचा भारा सहज उचलून नेऊन गोठ्यातील गव्हाणीत टाकी. त्यास सहावे वर्ष लागल्यावर तो पंचवीस वर्षांच्या पहिलवानाच्या बरोबरीचे ओझे उचलू लागला.

बोझनकेट या गावी जन्मलेल्या अशाच एका मुलाची वाढ लोकविलक्षण होती. या मुलाची उंची चवथ्या वर्षी चार फूट तीन इंच होती. सहावे वर्षी तो पाच फूट उंच झाला. त्याला दाढीसुद्धा फुटली. त्याचा आवाज मर्दानी झाला. तो पोक्त पुरवत्या पुरुषाप्रमाणे दिसू लागला. सर्व लोकांची समजूत अशी की हा आता वाढणार तरी किती आणि कसा ?


परंतु चमत्कार असा की तो विसाव्या वर्षी वृद्ध दिसू लागला. त्याचा आवाज खोल गेला. त्याचा चेहेरा म्हातारा दिसू लागला. एक वर्षातच तो शुद्ध म्हातारा झाला.

'पॅरिस मेमरीज' या पुस्तकात एका मुलीची अशीच एक गमतीची गोष्ट लिहिली आहे. ही मुलगी चवथ्या वर्षी चार फूट सहा इंच उंच झाली, आणि एकाद्या पोक्त बाईसारखी दिसू लागली.

या सर्व घटनांचे वैज्ञानिक स्पष्टीकरण कदाचित् आता देता येईल. पण त्यांच्याच बाबतीत असे का घडले ? हे एक प्रश्नचिन्हच.

✦ ✦ ✦

# १३. प्रकाशचक्राचे गूढ



दिनांक १० जून १९०९, पहाटे ३ चा सुमार, पाण्याच्या पृष्ठभागाखाली दिसलेला चमत्कार, प्रचंड वेगाने गरगर फिरणारे प्रकाशचक्र, नाविकांनी प्रत्यक्ष पाहिलेले आणि शास्त्रज्ञांना आश्चर्यात बुडविणारे गूढरम्य दृश्य.

अशा धर्तीच्या सनसनाटी बातम्यांनी १९०९ सालच्या जून महिन्यातील वर्तमानपत्रे ज्यामुळे गाजली असे एक चमत्कारिक प्रश्नचिन्ह शास्त्रज्ञांपुढे निसर्गाने टाकले होते. ते अजूनही प्रश्नचिन्हच राहिले आहे. त्याचे असे झाले--

डॅनिश इस्ट एशियाटिक कंपनीची एक आगबोट-बिटांग तिचे नाव-मलाक्काच्या सामुद्रधुनीतून चालली होती. दि. १० जून १९०९. पहाटे तीनचा सुमार. अंधार मी म्हणत होता. कॅप्टन गेब डेकवर उभा राहून समुद्राच्या पाण्याकडे पहात होता.

त्यावेळी समुद्राच्या पाण्याखाली जे काही दिसले त्याचे वर्णन त्याच्याच शब्दांत पाहू :

'एक प्रचंड प्रकाशचक्र पाण्याच्या पृष्ठभागाखाली अगदी पृष्ठभागालगतच गरगरा अगदी प्रचंड वेगाने फिरत असलेले मला दिसले. त्याच्या केंद्रापासून मोठाल्या किरणशलाका निघाल्या होत्या आणि त्या केंद्राभोवती झपाट्याने चक्राकार गतीने फिरत होत्या. ते प्रकाशचक्र इतके प्रचंड होते की त्याचा अर्धा भागच मला दिसत होता. अर्धा क्षितिजापलीकडे होता. दुसऱ्या कुठल्याही ठिकाणाहून प्रकाश किरण येत नव्हते याची मी खात्री करून घेतली. जवळपास एकही जहाज नव्हते. माझ्या 'विंटांग' बोटी-वरच्या दिव्यांच्या प्रकाशामुळेही हा चमत्कार घडणे शक्य नव्हते. कारण प्रकाशचक्राच्या किरणशलाका फारच लांब लांब होत्या. आणि माझ्या बोटीवरील दिव्यांच्यापेक्षा अगदी उलट आणि विविध दिशेने त्या प्रकाशशलाका आल्यासारख्या दिसत होत्या. आणि 'विंटांग' बोटीच्या वेगाच्या मानाने त्या चक्राचा भ्रमणवेग फारच प्रचंड होता. ते प्रकाशचक्र अगदी स्वतंत्ररीत्या पाण्याच्या पृष्ठभागाखाली उमटले होते. हळुहळू ते प्रकाशचक्र बोटीजवळ आले आणि पुसट होत होत पाण्यात खोल खोल जात नाहीसे झाले.'

हे प्रकाशचक्र दिसले खरे. पण ते तिथे आले कुठून? कसे? का? उत्तर सापडत नाही. त्या रात्री समुद्राच्या तळाशी काही प्रचंड घडामोड चालू होती काय? असेल तर त्या घडामोडीचे स्वरूप काय होते? डॅनिश वेधशाळेच्या (मीटीऑरॉजिकल इन्स्टिटयूटच्या) एका प्रकाशित झालेल्या अहवालात नोंद केलेल्या ह्या निसर्ग चमत्काराच्या गूढाबद्दलचे प्रश्नचिन्ह, शास्त्रज्ञांना अजून सोडवता आले नाही एवढे मात्र खरे.

✦ ✦ ✦

# १४. राजापूरच्या गंगेसारखेच काहीतरी

महाराष्ट्रात राजापूरची गंगा हा एक निसर्ग-चमत्कार आहे. नैसर्गिक वक्रनलिकेच्या तत्त्वावर तो घडत असावा असे वैज्ञानिक स्पष्टीकरण त्याला आता दिले जाते. त्यासारखेच काहीतरी आल्प्स पर्वताच्या पायथ्याशी क्राइन प्रांतात 'सरकन्स्' या नावाच्या सरोवराचे बाबतीत घडते.

या सरोवराचा घेर पन्नास मैलांहून अधिक आहे. ह्या सरोवराच्या तळाशी चुनखडीचा थर असल्यामुळे, ते पाण्याने भरते तेव्हा एखादा मोठा निर्मळ आरसाच ठेवला आहे असे वाटते. पाणी जाऊन सरोवर रिकामे झाले म्हणजे एखादे मोठे विस्तीर्ण पांढरे वस्त्रच पसरले आहे असे वाटते.

या सरोवराच्या पूर्व बाजूस तीन मैलांच्या घेरातील जागेत शेकडो विवरे आहेत. सरोवर भरावयाच्या वेळी ती आपोआप उघडतात आणि लागलीच बंद होतात. तसेच सरोवर रिकामे होतानाही ती उघडतात आणि लागलीच बंद होतात.

पण का ? अजून नीटसे न सुटलेले प्रश्नचिन्ह !

✦ ✦ ✦

# १५. प्रलयंकारी गर्द अंधार



काळ्याकुट्ट ढगांनी आभाळ भरून अंधारून आले की आपणही उदास होतो, भीतिग्रस्त होतो. सारी सृष्टी उत्साहहीन झालेली वाटते. आपण त्या दिवसाला दुर्दिन म्हणतो. त्यातच क्षणोक्षणी विजांचा चमचमाट, गड्गडाट यांची भर पडली की आपल्याला प्रलयकालाच्या कल्पनेची आठवण होते. त्यातच मुसळधार पाऊस सुरू झाला की पृथ्वी बुडण्याची वेळ आली असा आपल्याला भास होतो. काळ्या शाईनेच जणू आकाश सारवले आहे असा भास करून देणारे काळे ढग रात्रीच्या वेळी आकाश भरून टाकतात. त्या वेळी तर आपल्याला काळरात्रीची आठवण होते. डोळ्यात बोट घातले तर दिसणार नाही असे आपण त्या वेळच्या काळोखाचे वर्णन करतो. या साऱ्या घटना नेहमी घडणाऱ्या, माहीत असणाऱ्या असूनसुद्धा, त्या घडल्या म्हणजे आपण, तसे म्हटले तर, उगीचच चिंताग्रस्त होतो. भर-दिवसा अंधारून ते किती येणार? आणि पावसाळ्या रात्री काळोख असून किती असणार? शिवाय त्या वेळी घोंघावणारे

वारे, होणारे गडगडाट, चमकणाऱ्या विजा, कोसळणारा पाऊस यांच्या आवाजांनी निसर्गच एक प्रकारे आपल्याला सोबत करतो. पण यांपैकी कसलीच सोबत नसणारा, आभाळात एकही ढग न दाखवता येणारा—भर दिवसा येणारा—अंधार, सर्वांत जास्त भयाण, प्रलयंकारी आणि 'आता जगाचा शेवट जवळ आला' असेच भासवणारा वाटला तर त्यात नवल नाही. असा अंधार चौदा तास भोगावा लागला तर त्यासारखी जीवघेणी दुसरी गोष्ट नाही, आणि तो जसा आला तसाच नाहीसा झाला, तर त्यासारखे शास्त्रीय आश्चर्य नाही. तो कसा आला, का आला व कुठे गेला ? कुणालाही धोका न देता इतका वेळ राहिला कसा ? या साऱ्यांचे शास्त्रीय स्पष्टीकरण देता आले नाही की, तो एक चमत्कार होऊन बसतो. अशा तऱ्हेचा चमत्कार १९ मे १७८० या दिवशी अमेरिकेतील न्यू इंग्लंड या परगण्यात घडला.

त्या दिवसाची सकाळ सुखद, रम्य आणि निरभ्र होती. उबदार वारा वाहात होता, डोळ्यांना सुखवणारा स्वच्छ प्रकाश होता. सारी सृष्टी उत्साहाने उगवत्या दिवसाचे स्वागत करून कामाला लागली होती.

सकाळी १० वाजण्याचे सुमाराला नैर्ऋत्येच्या बाजूला आकाश धूसर दिसू लागले, थोडे अंधारून आले आणि थोड्याच वेळात नैर्ऋत्येला दिसणारा धूसरपणा वाऱ्याबरोबर ईशान्येच्या दिशेने झपाट्याने पसरू लागला. तासाभरात तो धूसरपणा कॅनडाच्या सीमेपर्यंत जाऊन पोहोचला. त्याच्या पाठोपाठ अत्यंत गर्द असा अंधार साऱ्या न्यू इंग्लंड परगण्यावर पसरला. क्षणाक्षणाला तो अंधार जास्त जास्तच गडद होत होता. घराघरांतून आणि रस्त्यारस्त्यांतून मेणबत्त्या पेटवल्या गेल्या. भर दिवसा

मशाली पेटवून लोक हिंडू लागले. अंधाराचा गर्दपणा क्षणाक्षणाला वाढतच होता. साऱ्या परगणाभर गोंधळ माजला. लोक आपले नेहमीचे व्यवहार, सचिंत मनाने का होईना पण संथपणे करायचा प्रयत्न करीत होते, पण शेवटी त्यांचाही धीर सुटला. शाळाचालकांनी दुपारी बाराचे सुमारास शाळा सोडून दिल्या. दुकाने बंद केली गेली. कारखान्यांना सुट्टी मिळाली. न्यू इंग्लंड-मधील सारी जनता, या भर-दिवसा अनपेक्षितपणे पसरलेल्या, भयाण काळोखामुळे भीतिग्रस्त झाली. पण त्या प्रलयंकारी काळोखाची ती नुसती सुरुवात होती.

पावसाळ्यातील मेघाच्छादित अमावस्येच्या रात्री असणाऱ्या काळोखासारखा काळोख, दुपारी १ वाजण्याचे सुमारास साऱ्या न्यू इंग्लंडवर पसरला होता. चिंतेचे भीतीत आणि भीतीचे सामुदायिक घबराटीमध्ये रूपांतर होऊन सगळीकडे एकच हाहाकार माजला. प्रार्थनामंदिरे उघडली गेली, आणि थोड्याच वेळात, भीतीने जिवाचा ठाव सुटलेल्या लोकांची, प्रार्थनेसाठी तेथे एकच गर्दी झाली. धर्मोपदेशकांनी आता परमेश्वरी कोपाचा दिवस आला, असे जाहीर केले.

मेन प्रांत व न्यू हॅंपशायर, मॅसाच्युसेटस्, ऱ्होड आयलंड आणि कनेक्टिकट या प्रांतावरही हा प्रलयंकारी अंधार पसरला होता. इतकेच नव्हे तर न्यूयॉर्कचा पूर्व भाग आणि पेन्सिल्व्हानियाचा ईशान्य भाग यांवरही त्या अंधाराची दृष्टी वळली होती.

कनेक्टिकट परगण्यात हार्टफोर्ड येथे विधानसभेची बैठक भरली होती. दुपारी बैठकीत वसलेल्या सभासदांना एकमेकांचे दर्शनही अशक्य झाले आणि भीतिग्रस्त सभासदांच्या गोंधळामुळे

बैठक मोडण्याची वेळ आली. तेवढ्यात श्री. डेव्हनपोर्ट नावाच्या सभासदाने सभापतीला विनंती केली, 'अध्यक्ष महाराज ! आज परमेश्वरी प्रकोपाचा दिवस असो वा नसो, सभा बरखास्त करण्याचे काहीच कारण नाही. जर हा जग बुडण्याचाच दिवस असला तर निदान आमचे कर्तव्य करताना मृत्यू आला हे तरी समाधान आम्हाला लाभू दे ! म्हणून मेणबत्त्या लावून आणायला सांगा आणि मेणबत्त्यांच्या प्रकाशात बैठकीचे काम पुढे चालू करा.'

दुपारी ४ च्या सुमाराला तर अंधार इतका गडद झाला की डोळ्यापासून काही इंचावर धरलेला पांढरा स्वच्छ कागदसुद्धा डोळ्यांना दिसणे अशक्य झाले. निःशब्दतेने पसरणाऱ्या आणि क्षणोक्षणी जास्तच गडद आणि भयाण होणाऱ्या या काळोखामुळ लोकांच्या मनाचा ठाव सुटला. जगाच्या अंतकाळच्या स्फोटाची वाट पाहात सारेजण ओक्साबोक्शी रडत, प्रार्थना करीत, पण अगदी जिवाचे कान करून बसले होते. तो प्रलयंकारी व आकाश भेदून जाणारा स्फोट कधी ऐकू येणार आहे याची धडधडत्या हृदयाने सारीजण वाट पाहात होती.

काळोखाचा गडदपणा जेव्हा अगदी पराकोटीला पोहोचला तेव्हा एक चमत्कारिक अद्भुत प्रकाश दिसू लागला. मशालीच्या व मेणबत्त्यांच्या उजेडात दिसणाऱ्या वस्तू अद्भुत अशा अनैसर्गिक रंगांनी झळाळत आहेत असे दिसू लागले. विशेषतः मंद असा हिरवट प्रकाश त्या काळोखातूनही कोठून तरी येतो आहे असे दिसू लागले. थोड्या वेळाने हाही दिलासा देऊ शकेल असा प्रकाश नाहीसा झाला; आणि जणू अनंतकाळ चालणाऱ्या रात्रीचाच गर्द अंधार पुन्हा चोहीकडे भरून राहिला.

रात्री नऊ वाजता पौर्णिमेचा चंद्र उगवणार होता. पण नऊ वाजून गेले तरी चंद्राचा मागमूसही आकाशात दिसत नव्हता आणि अंधार होता तसाच राहिला होता.

सरतेशेवटी रात्री १ वाजता प्रकाशाचा भास व्हायला सुरुवात झाली. तो चंद्र-प्रकाश होता. आकाशात जवळजवळ मध्यावर तांबडा भडक चंद्र हळुहळू दिसू लागला. थोड्या वेळाने तारेही चमकू लागले. आणि शेवटी दिनांक २० मेच्या पहाटेच्या सुमारास पूर्वेकडे उषःकालचा सुखद संधिप्रकाश सर्वांना उत्साहदान करू लागला. २० मे रोजी सकाळी सूर्य उगवला तो अगदी १९ मेच्या सकाळसारखाच. स्वच्छ, झगझगीत, सुखद, उबदार किरणांचा वर्षाव पृथ्वीवर करीत. त्याने न्यू इंग्लंडमधील अंधार-ग्रस्त जीवन पुन्हा उजळून टाकले, आनंदी केले. प्रलयंकारी अंधारात चौदा तास जीव मुठीत धरून ठेवलेल्या जनतेने जणू पुनरुज्जीवनच देणाऱ्या नव्या दिवसाचे स्वागत अगदी आनंदाचा जल्लोष करूनच केले.

हा अद्भुत अंधारी दिवस १९ मे १७८० न्यू इंग्लंडच्या इतिहासात काळा शुक्रवार (ब्लॅक फ्रायडे) म्हणून नोंदला गेला आहे.

न्यू इंग्लंडवर हा अद्भुत चौदा तास पसरून राहिलेला गडद अंधार आला कुठून ? कसा आला ? गेला कुठे आणि कसा गेला ? या साऱ्यांचे शास्त्रीय स्पष्टीकरण काय ? की हे निसर्गाचे न सुटणारे कोडेच आहे ? हे प्रश्न अजूनही शास्त्रज्ञांना सताव-तात आणि त्यांच्याकडून अजूनही ते अनुत्तरित राहिले आहेत.

✦ ✦ ✦

# १६. इटालीतील धन्वंतरी

फेरो शहरात सुमारे पावणेतीनशे वर्षांपूर्वीचा एक जुना लेख उपलब्ध होता असे म्हणतात. सोळाव्या शतकातील वैद्यक शास्त्रातील प्रगती त्यावरून किती होती हे कळते.

अजूनही ईजिप्तमधील ममींचे गूढ पूर्ण कुठे उकलले आहे? 'ॲक्युपंक्चर' (वेदना कमी करण्यासाठी शरीराच्या दुसऱ्या भागात सुया खुपसणे) हा चिनी वैद्यकीय उपचार अजूनही पूर्ण कुठे आकलन झाला आहे? आयुर्वेदीय काही औषधींच्या अलौकिक गुणांचे कोडे काही अंशी अजून तसेच कायम आहे.

फेरो शहरातील जुना लेख म्हणजे एका वैद्यकतज्ज्ञाने त्या शहरातील प्रसिद्ध आयु:शास्त्रवेत्ते, वनस्पतिशास्त्रज्ञ आणि इतर सर्व नगरवासी, यांच्याकडून मिळवलेली एक सनद आहे.

या वैद्यकतज्ज्ञाची परीक्षा गुरुजनांनी सर्व लोकांसमक्ष घेतली. हा वैद्यकतज्ज्ञ इटालियन होता. त्याचे नांव जनरो सोमारिनी.

त्या काळी फेरो शहर विद्येचे आगर होते. शरीरशास्त्र, वनस्पतिशास्त्र याविषयी मोठ्या नामांकित असलेल्या या शहरात वैद्यक महाविद्यालयेही होती.

सोमारिनीने वैद्यविद्यालयांच्या गुरुकडे, 'आपणास एकादी वैद्यकशास्त्राची पदवी मिळावी,' म्हणून एक अर्ज केला. पण तिथल्या गुरूंनी आणि शस्त्रवैद्यांनी औषधविषयक प्रत्यक्ष परीक्षा घेतल्याशिवाय पदवी देण्याचे नाकारले.

सोमारिनीने सर्व लोकांसमोर परीक्षा देण्याचे मान्य केले. त्या सनदेतल्या लेखात असा उल्लेख आहे की, 'सिन्योर जनरो

सोमारिनी यांची औषधी आणि वैद्यकीय ज्ञानासंबंधी जाहीरपणे परीक्षा घेण्यात आली.'

सोमारिनी याने 'ओर्व्हिटोन' नावाची एक अद्‌भुत वाटणारी गुणकारी औषधी तयार केली होती. त्याने या औषधींचे गुण प्रत्यक्ष स्वतःवरील प्रयोगाने दाखवून दिले.

या परीक्षेचा समारंभ फेरो शहराच्या मध्यावर बांधलेल्या सुंदर आणि भव्य अशा सार्वजनिक इमारतीत झाला. ह्यावेळी शहरातील नानाजातीचे लोक, बहुतेक सर्वच लोक व कामगार, दुसऱ्या शहरातून आलेले लोक या सर्वांच्या आणि सनद देणाऱ्यांच्या समक्ष नाना प्रकारचे औषधी चमत्कार त्याने करून दाखवले. त्यापैकी खालील विशेष वर्णनीय आहेत.

सोमारिनीने काही जिवंत विषारी बेडूक आणवले. कुणालाही शंका येऊ नये, विकल्प निर्माण होऊ नये, म्हणून ते त्याने दुसऱ्याकडून आणवले होते. नंतर एका कामगाराला बोलावून त्याच्याकडून पाच बेडूक निवडून घेतले. ते निवडलेले भले मोठे बेडूक सोमारिनीने उभे फाडून त्या चिरफळचा हातात घेऊन त्यांचा रस एका पेल्यात पिळला. तो एकदा नीट ढवळून सर्वांसमक्ष चटकन सारा एका घोटात पिऊन टाकला. नंतर तो लोकांच्या समोर येऊन बसला.

एक दोन क्षणातच त्याला मूर्च्छा येऊन तो निश्चेष्ट पडला. त्याचे हातपाय थरथर कापू लागले. त्याचे शरीर निस्तेज झाले. त्यावर शुद्ध प्रेतकळा आली. तो अंगास अधिकाधिक आळोखेपिळोखे देऊ लागला. अधूनमधून भयंकर, केवळ मरणवेळचे वाटतील, असे गचके देऊ लागला.

पाहाणाऱ्यांची खात्रीच झाली की हा काही आता जगत नाही. उपस्थित वैद्यांनी त्याची तपासणी केली आणि निर्णय दिला की ' हा आता थोडचा वेळचा सोबती आहे. '

नंतर सोमारिनीने आपला हात वर करून जवळच ठेवलेल्या एका भांड्यातून त्याने तयार केलेल्या 'ऑव्हिटोन' या औषधाची एक चिमूट घेतली, आणि तोंडात टाकून गिळली.

निमिषार्धात त्याला ओकारी येण्यास सुरुवात झाली. पोटात गेलेला सारा विषारी रस भडभडा ओकून बाहेर पडला.

नंतर तोंड धुवून सोमारिनी पूर्वीप्रमाणे ताजातवाना होऊन प्रेक्षकांपुढे उभा राहिला.

त्याच्या वैद्यकज्ञानाबद्दल फारच वाहवा झाली.

त्याच्या जयघोषाने सारी इमारत दुमदुमून गेली. तेथे जमलेल्या विद्वानांनी त्याला आदराने आपल्या घरी बोलावून नेले. तेथेही त्याने आपल्या अनेक औषधांचे लोकविलक्षण गुणधर्म दाखवले.

त्याच्यापाशी एका जातीच्या सर्पापासून तयार केलेली पूड होती. ती कोणत्याही जातीच्या तापावर अगदी बिनतोड लागू पडत असे. तिचे त्याने निरनिराळ्या दर्जाच्या आणि धंद्यांच्या लोकांवर निरनिराळे प्रयोग करून पाहिले आणि त्या पुडीच्या लोकविलक्षण गुणांनी सर्वजण चकित झाले. त्यांच्यापुढे ताप थाऱ्यामोऱ्यास राहीना.

त्याने एक सुगंधी उटणे तयार केले. त्या उटण्याने जखमा, चरका, खोका, भाजलेले इत्यादी कोणत्याही दुखापती तात्काळ बऱ्या होत असत.

या उदाहरणावरून शेवटच्या बाजीरावापाशी असलेले वामनराव वैद्य, पुण्याचे बापूसाहेब मेहेंदळे आणि इस्लामपूरचे बापू वैद्य ही सर्व आपल्या देशातील उदाहरणे खरी वाटू लागतात. त्यांचीही दिव्य औषधीतली प्रगती केवळ दंतकथा पद्धतीची नसून खरी असावी असे मानण्यास हरकत वाटत नाही.

आधुनिक वैद्यकशास्त्रज्ञांना जुन्या काळात इतकी प्रगती झाली कशी याचे आश्चर्य वाटते हे खरे. हे कोडे मात्र त्यांना अजून सुटत नाही असे दिसते.

✦ ✦ ✦

# १७. अद्भुत छायाचित्रे

मनुष्य ज्यावेळेला आपल्या शास्त्रीय प्रगतीच्या सुसाट वेगाने निसर्गाला जिंकल्याबद्दल स्वतःचे कौतुक करू लागतो त्यावेळी निसर्ग त्याला एखादे वेळेस असे काही कोडे घालतो की आपले सर्व शास्त्रीयज्ञान पणाला लावूनही मनुष्याला त्याचे उत्तर सापडत नाही. याचा अर्थ असा मात्र नव्हे की त्या कोड्याचे उत्तर मिळायला शास्त्रीय स्पष्टीकरण अथवा शास्त्रीय पद्धती अशक्यच आहेत आणि ते कोडे सोडवणे शास्त्रीय ज्ञानाच्या पलीकडचे आहे. कारण प्रत्यक्षात सारे विश्वच संपूर्ण शास्त्रोक्त आहे. त्याची निर्मिती, त्याचे अस्तित्व, त्यातील घडामोडी सारे काही अगदी गणिती आहे. हे आता कितीतरी शास्त्रज्ञांनी सप्रमाण सिद्ध केले आहे. उदाहरणार्थ डॉ. आइनस्टाइन यांचे शास्त्रीय सिद्धान्त हे यांपैकी आहेत. तेव्हा शास्त्रज्ञांपुढे जी प्रश्नचिन्हे पडली आहेत त्यांचे स्पष्टीकरण अजून सापडले नाही. पण ते सापडले तर हवे आहे.

अद्भुत छायाचित्रे ही अशा प्रश्नचिन्हांपैकीच एक आहेत.

आकाशात चमकणाऱ्या विजेच्या प्रकाशात छायाचित्र घेणे हे काम कॅमेऱ्याच्या साहाय्याने अगदी सहजपणे करता येते. पण आकाशात चमकणारी वीजच ज्यावेळी स्वतःच छायाचित्रे काढण्याचे काम करू लागते त्यावेळी ते काम ती कसे करते याबद्दल शास्त्रज्ञांपुढे प्रश्नचिन्ह उभे राहते.

आकाशात चमकणारी वीज अत्यंत उत्तम आणि स्वच्छ दिसणारी छायाचित्रे खिडक्यांच्या तावदानावर अथवा तत्सदृश

पदार्थावर कोरून काढते आणि मनुष्याला आश्चर्याचा धक्का देते, असे कित्येक वेळा घडले आहे. याचे शास्त्रीय स्पष्टीकरण–म्हणजे हे कसे होते–हे मात्र आजपर्यंत कोणीच सांगू शकलेले नाही.

इसवी सन अठराशे सत्त्याऐंशीमध्ये अशी एक सत्यकथा ग्रॅनी ऑस्बोर्न या नावाच्या एका म्हातान्या विधवेच्या बाबतीत घडली आहे. टेनेसी परगण्यात (अमेरिकेत) क्लीव्हलँड आणि चट्टनूगा यांना जोडणाऱ्या रस्त्यावर ऊल्टेवाह नावाच्या खेड्यात ही म्हातारी विधवा आपल्या छोट्याश्या बंगलीत अगदी अंथरुणाला खिळून पडून कशीबशी जगत दिवस कंठीत होती. तिचा नवरा आणि ती त्यांच्या लहानशा शेताच्या उत्पन्नावर कशीतरी गुजराण करीत असतानाच तिचा नवरा मरण पावला आणि हिची स्थिती त्यामुळे अधिकच हलाखीची झाली होती.

एक दिवस प्रचंड झंझावाताने त्या भागात हलकल्लोळ उडवून दिला. पावसाळी ढगांची आकाशात गर्दी उडाली आणि विजांचे प्रचंड कडकडाट आणि चमचमाट होऊ लागले. एकदम एक मोठा विजेचा लोळ कडाडत आकाशातून जमिनीवर आला आणि ग्रॅनीच्या घराच्या समोरच्या रस्त्यापलीकडचा एक मोठा पाइनचा वृक्ष त्या विजेच्या लोळाच्या धक्क्याने उन्मळून पडला. झंझावाताचे, वीज कडाडत खाली येण्याचे आणि वृक्ष उन्मळून पडण्याचे दृश्य ग्रॅनीने खिडकीच्या काचेच्या तावदानातून पाहिले. झंझावात पाहण्यासाठी म्हणून ती एका हाताच्या कोपराच्या आधाराने अर्धवट उठून बसून काचेच्या तावदानातून बाहेर बघत होती. विजेच्या कडकडाटाने आणि लोळाच्या डोळे दिपवणाऱ्या प्रखर प्रकाशाने मानसिक धक्का बसून ती एकदम परत मागे

आपल्या उशीवर पडली आणि त्याच क्षणी गतप्राण झाली. काही वेळाने तिच्या अंत्यविधीसाठी तिचे शेजारी आणि नातेवाईक तिच्या बंगलीकडे आले. बंगलीभोवतालच्या बागेतून बंगलीच्या मुख्य दाराकडे येताना ग्रॅनी राहात असलेल्या खोलीच्या खिडकी-जवळून ते जात होते. त्यांनी सहज त्या बंद खिडकीकडे पाहिले आणि त्यांना आश्चर्याचा धक्का बसून भीतीने त्यांना दरदरून घाम सुटला व त्यांची बोबडी वळायची पाळी आली. कारण कानटोपी घातलेली ग्रॅनी खिडकीच्या तावदानातून त्यांच्याकडे बघून आपल्या दंतहीन तोंडाने हसते आहे असे त्यांना दिसले. ते सारेजण घाईघाईने बंगलीत शिरले. ग्रॅनीच्या खोलीत खाटेवर तिचे शव पडले होते. पण खिडकीच्या तावदानावर मात्र तिची तसबीर अगदी कोरल्यासारखी काढली गेलेली दिसत होती. एखाद्या कॅमेऱ्याने घेतलेल्या छायाचित्राइतके अगदी सूक्ष्म बारकावे तीत दिसत होते. मरणापूर्वी ग्रॅनी खिडकीतून बाहेर बघत असताना विजेच्या लोळाच्या परिणामाने बहुधा हे ग्रॅनीचे छायाचित्र खिडकीच्या तावदानावर कोरले गेले असावे. शास्त्रीयदृष्टया ते कसे झाले असावे याचा तपशील सध्यातरी अतर्क्य आहे. ग्रॅनीचे हे छायाचित्र त्या तावदानावर बरेच दिवस होते. नंतर ते हळुहळू पुसट होत होत नाहीसे झाले.

वरील सत्यकथेसारखीच दुसरी एक सत्यकथा १९०३ साली वॉशिंग्टन येथे घडली. एका रात्रीच्या मेजवानीच्या प्रसंगी आलेल्या पाहुण्यांना त्या दिवाणखान्याच्या बागेकडील एका खिड-कीच्या तावदानावर दोन चेहरे छायाचित्रित झालेले दिसले. एक चेहरा एका धिप्पाड निरोगी पुरुषाचा होता आणि दुसरा एका रोड, अशक्त अशा जख्ख म्हातारीचा होता.


त्या बंगल्याच्या पहिल्या मालकाला बोलावून घेऊन ती छायाचित्रे त्याला दाखविण्यात आली. त्याने त्या व्यक्तींना लगेच ओळखले. तो माणूस त्या मालकाचा पिता होता व ती जख्ख म्हातारी त्या मालकाची आजी होती. त्या दोघांनाही विजा कडाडत असलेल्या वादळांची गंमत त्या खिडकीत बसून पाहण्याची फार आवड होती. ते तावदान काढून एका म्यूझियममध्ये नेले गेले. शास्त्रज्ञांनी त्याची नीट शास्त्रोक्त परीक्षा केली. आकाशा-तल्या विजेच्या चमचमाटाने ही छायाचित्रे तावदानावर कोरली गेली असावीत, यापलीकडे त्यांनाही उत्तर देता आले नाही.

दोन डिसेंबर १८९१ ला न्यू आल्बनी, इंडियाना, येथे श्रीमती सोफिया स्कार्फ या बाई ईस्ट फिफ्थ, स्प्रिंग स्ट्रीटवरील आपल्या घरात मरण पावल्या. त्यांच्या अंत्यविधीनंतर दुसऱ्या दिवशी त्या बाईची सून त्या घरात काही वस्तू आणण्यासाठी गेली. घराच्या पुढील खोलीच्या खिडकीच्या तावदानातून आपल्या सासूचा चेहरा आपल्याकडे पाहतो आहे असे तिला दिसले आणि भीतीने तिची दातखिळ बसायची वेळ आली. हेही छायाचित्र बहुधा विजेनेच तावदानावर कधीतरी कोरले होते आणि ते काही दिवसांनी हळूहळू नाहीसे झाले. काही आठवड्यांनी ते परत दिसू लागले. प्रथम पुसट आणि नंतर चांगले ठळक दिसू लागले. ते कुठल्याही तऱ्हेने पुसले जाईना. ( त्याहीपेक्षा आश्चर्याची गोष्ट ही की श्रीमती स्कार्फ बाईंचा मुलगा कॅलिफोर्नियाहून, त्यांच्या अंत्यसंस्कारानंतर येऊन पोहोचला. त्याने आपल्या हातरुमालाने ते तावदानावरील छायाचित्र पुसले आणि ते नाहीसे झाले, अगदी कायमचे. )

डेमन्सव्हील केन्टुकी याच्या पश्चिमेस सहा मैलांवर आपल्या बंगल्यात जेसेस्मिथ नावाचा एक वयस्कर शेतकरी राहात होता. १८६५ च्या वसंतऋतूच्या सुरुवातीला एक मजेदार पण गोंधळात पाडणारी गोष्ट त्याच्या घरात घडून आली. त्या वेळी सिव्हिल वॉर चालू होती आणि आघाडीवरून येणाऱ्या बातमीची व आज्ञेची स्मिथ वाटच पाहात होता. एके दिवशी सकाळी फार मोठे पावसाळी वादळ झाले. वादळ थंडावल्यानंतर त्याच्या घराच्या एका तीन तावदानी खिडकीच्या तावदानावर सहा इंच रुंदीचे इंद्रधनुष्य, अगदी त्याच्या सप्तरंगांच्या सर्व छटांसह, त्याला दिसले. घराबाहेरूनच फक्त ते तावदानावर दिसत होते. पहिल्यांदा ते आकाशातल्या इंद्रधनुष्याचे प्रतिबिंब आहे असे स्मिथला वाटले. पण तावदान वर केल्यावर ते तावदानाबरोबर दिसेनासे झाले. कारण ते इंद्रधनुष्य आकाशातल्या विजेच्या चमचमाटाने पावसाळी वादळात त्या तावदानावर कोरले होते. ते इंद्रधनुष्याचे अद्‌भुत छायाचित्र बघायला शेकडोंनी लोक येऊ लागले. चाललेल्या सिव्हिल वॉरशी याचा दैवी संबंध असावा असे लोक म्हणू लागले. काही दिवसांनी युद्ध संपले. पण तावदानावर इंद्रधनुष्य तसेच राहिले. सिनसिनाटी इन्क्वायरर नावाच्या एका जिज्ञासूने वीस वर्षांनी ते पाहिले आणि त्याची छाननी केली, आणि शेवटी ते शास्त्रज्ञांपुढील एक प्रश्नचिन्ह असेच आपले मत दिले. ही अद्‌भुत छायाचित्रे आकाशातल्या विजेच्या योगाने कोरली गेली याबद्दल शास्त्रज्ञांत दुमत नाही. पण ती कशी ? शास्त्रीय प्रश्नचिन्हच.

✦ ✦ ✦

# १८. न परतीची जागा



खरोखर बहुधा स्वर्गवासच. सदेह. सर्वार्थाने. म्हणजे विमानातून प्रत्यक्ष आकाशात झेप, आणि तिथून तशीच बहुधा स्वर्गात झेप. अर्थात प्रत्यक्ष स्वर्ग कसा आहे हे सांगायला परत येणे नाही, इतकेच! कसलाही मागमूस नाही. असा आगळा चमत्कार. हो! चमत्कारच म्हणावयाचा!! कारण या साऱ्या घटनेला काहीच स्पष्टीकरण नाही. काही शास्त्रीय खुलासा अजूनतरी सापडत नाही, त्या अर्थी हा चमत्कारच म्हणायला पाहिजे. शास्त्रज्ञांपुढे हे एक प्रश्नचिन्हच उभे आहे. प्रश्नचिन्हच म्हणायला हवे. कारण एक छोटासा बॉम्बफेक्या विमानांचा ताफा नेहमीसारखा आकाशात झेप घेतो काय, अटलांटिक महासागरावरून पूर्वेकडे प्रवास करताना रेडिओवर घाबरे संदेश येतात काय, आणि ते संदेश अकस्मात् बंद पडून त्या विमानाचा मागमूसही पुढे कुठेही कसा लागत नाही काय! अशी गेली तरी कुठे ती वाऱ्यावर विरून? असा शास्त्रज्ञांच्या पुढे कायम प्रश्न पुन्हा, पुन्हा दोनतीन घटनांनी उमटतच राहिला आहे. त्याचं असं झालं--

पाच डिसेंबर १९४५ ची दुपारची वेळ होती. 'पाच टी. बी. एम् ॲव्हेंजर' नावाची बॉम्बफेकी विमाने विमानतळावरून

नेहमीच्या सरावाप्रमाणे आकाशात झेपावली. फोर्ट लॉडरडेल, फ्लॉरिडा, येथील नेव्हल एअर स्टेशनचा विमानतळ अशा तऱ्हेच्या चाचण्यांसाठी नेहमीच वापरला जात असे. विमाने अशी झेप घेऊन जवळच्या महासागरावरून त्रिकोणाकृती मार्गाने परतत असत. पहिली झेप पूर्वेकडे मग एकदम वळण घेऊन परतीच्या मार्गाकडे आणि पुन्हा शेवटच्या वळणाने विमानतळाकडे अशी ती चाचणी असे. ५ डिसेंबरला ही नेहमीची झेप १६० मैल पूर्वेकडे, ४० मैल उत्तरेकडे, नंतर नैर्ऋत्येकडे वळून विमानतळावर, अशी आखली होती. आणि पूर्वी अशीच झेप अनेक वेळा यशस्वी झाली होती. पण ५ डिसेंबर हा कसला घातवार होता कुणास ठाऊक? काहीतरी अघटित घडले खरे !

त्या पाच विमानांपैकी एका विमानात दोघेजण आणि इतर चार विमानात प्रत्येकी तीन–तीनजण बसले होते. सर्वच विमानात उत्कृष्ट रेडिओ संपर्क उपकरणे आणि हवाई उड्डाणाची सर्व सुरक्षा साधने ठेवलेली होती. विमानातला प्रत्येक उतारू हा अनुभवी निष्णात वैमानिक होता.

सरकारी दप्तरात नोंद केल्यावरून असे दिसते, की ५ डिसेंबरला दुपारी दोन वाजून दोन मिनिटांनी पहिले विमान आकाशात झेपावले. आणि सहाच मिनिटांनी सर्वच्या सर्व विमानें आकाशात तरंगत होती. आणि अगदी सहजपणे दोनशे मैल वेगानें अटलांटिकचा किनारा ओलांडून सागरावरील आकाशात विहार करीत होती.

सुमारे पावणेतीन वाजता विमानतळावर संकटाची पहिली सूचना आली. खरे म्हणजे त्या वेळी, विमानांवरून तळावर विमान उतरवण्याबाबत सूचना काय? अशी विचारणा

अपेक्षित होती. पण त्या उलट तातडीचा संदेश मात्र आला... 'जमीन काही आमच्या दृष्टिपथात नाही'... 'कुठे आहोत याचा पत्ता लागत नाही ... आम्ही आहोत ते नक्की ठिकाण कोणते हे कळत नाही ...' सर्वच्या सर्वच विमानाधिकारी एकदम कसे वाट चुकले? एक कोडेच आहे. काही तरी अद्‌भुत, अनाकलनीय घडले खरे.

त्यानंतर पंधराच मिनिटांनी पाची विमानातले वैमानिक एकमेकांशी घाबऱ्या घाबऱ्या बोलत आहेत असे विमानतळावरच्या रेडिओवर ऐकू आले. आणि ते एकमेकात विमान चालविण्याचे काम आळीपाळीने करताहेत असेही कळल्यामुळे सर्वांनाच आश्चर्य वाटले. चार वाजून पंचवीस मिनिटांनी शेवटचा संदेश त्या दुर्दैवी विमान ताफ्यावरून ऐकू आला. 'कुठे आहोत कुणास ठाऊक... विमानतळाच्या ईशान्येला बहुधा सवादोनशे मैलावर असू... बहुधा आम्ही...!' यानंतर एकदम सारे बोलणे बंद होऊन शांतता! केवळ शांतता!! या पलीकडे काही नाही.

तातडीने या अघटित घटनेचा छडा लावण्याचे प्रयत्न सुरू झाले. विमानतळावरून तेरा साहाय्यक आणि सुटकेसाठी सारी साधने घेऊन मार्टिन नावाचे विमान घाईने आकाशात उडाले, पाच मिनिटात दृष्टिपार झाले. पण तेही कायमचेच दृष्टिआड गेले. त्याचाही कुठे मागमूस लागेना. म्हणजे झाले तरी काय?

किनाऱ्याचे संरक्षण करणाऱ्या विमानांनी समुद्रावर सारी रात्र तपास केला. दिवस उगवायच्या वेळी सॉलोमनस् नावाचे एक मोठे विमानवाहू जहाज विमाने घेऊन तपासाला निघाले. अशी एकवीस जहाजे तीनशे विमाने घेऊन नाहीशा झालेल्या

विमानांचा तपास करीत रात्र पडेपर्यंत सारखी हिंडत होती. त्याचप्रमाणे बारा पथके जमिनीवर सारा किनारा धुंडाळून शोध करीत होती. पण त्या नाहीशा झालेल्या विमानांचा थांगपत्ता लागला नाही. माणसे आणि विमाने दोहोंचा मागमूस नाही. कुठे तेलाचा तवंग नाही. कपड्याचा तुकडा नाही. अजून शोध चालू आहे. पण कुठल्याही विमानाचा सर्वतोपरी ठावठिकाणा नाही.

विमानखात्याच्या चौकशी समितीने जे काम केले, त्यातून असा निष्कर्ष निघाला की, नाहीशा झालेल्या विमानांनी रेडिओ-द्वारा आपली स्थिती ज्याअर्थी कळवली होती त्याअर्थी त्यातल्या वैमानिकांनी वैमानिक छत्र्यांचा उपयोग करून स्वतःची सुटकाही करून घेतली असेल.

विमानांची तूटफूट झाली असेल तर त्याचे अवशेष समुद्रात पडलेले मिळावयास हवे होते, पण तेही मिळाले नाहीत. बरं मार्टिन हे हवाई जहाज त्या विमानांच्या सुटकेसाठी गेले होते, त्याला समुद्राच्या पृष्ठभागावर उतरण्याची तरतूद होती, आणि रेडिओ संदेश देण्याची साधनेही होती. पण तेही हवाई जहाज या विमानासारखेच जमिनीवरून आकाशात झेप घेतल्यावर पाच मिनिटात मागमूस लागेना असे नयनापश्चात झाले. या सर्व विमानांचे झाले तरी काय ? ही हवेतल्या हवेत विरल्यासारखी कुठे गेली ? चौकशी समितीने बऱ्याच शोधानंतर असा निर्णय दिला की, 'या विमानांचे काय झाले असेल याचा आम्हाला अजून सुसंगत तर्कही करता येत नाही.'

याच घटनेप्रमाणे १९४८ साली जानेवारीच्या २९ तारखेला 'स्टार-टायगर' नावाचे चार इंजिनावर चालणारे मोठे विमान

किंगस्टन येथे जायला निघाले होते. आणि बर्म्यूडापासून चारशे मैलांवर असता त्याचा 'सर्व ठीक' असा रेडिओ संदेश आला होता. त्या विमानात सव्वीस उतारू होते. हवामान उत्तम होते. आणि कोणताही धोका शक्य नव्हता. पण त्या 'सर्व ठीक' संदेशानंतर 'स्टार टायगर' ह्या विमानाचे झाले काय? ते हवेवर विरले की काय? अशा तऱ्हेने अगदी ठावठिकाणा लागेना असे ते नाहीसे झाले. आणि पुन्हा कसलाही धोक्याचा रेडिओ संदेश नाही, अपघाताने पाण्यात पडले असल्यास पाण्यावर तेलाचा तवंग नाही की काहीही नष्टावशेष नाहीत. स्टार टायगर नाहीसे झाले, कसे आणि कुठे? माहीत नाही.

१७ जानेवारी १९४९ रोजी कॅप्टन जे. सी. मॅक्फी या वैमानिकाने एरियल विमान घेऊन बर्म्यूडाहून जमेकातील किंगस्टनकडे जाण्यासाठी विमानतळावरून उड्डाण केले. एक हजार मैलांचा प्रवास होता. अपेक्षित वेळेपेक्षाही जास्त दहा तास पुरेल इतके पेट्रोल या विमानाच्या टाकीत होते. बर्म्युडाच्या विमानतळावरून उडाल्यावर चाळीस मिनिटांनी कॅप्टन मॅक्फीने 'सर्व ठीक, हवा उत्तम, जमेकाला वेळेत पोहोचेन,' असा रेडिओ संदेश दिला. यानंतर मात्र त्या विमानाचा थांगपत्ता नाही. ते कधी जमेकाला पोहोचलेच नाही. त्याचे कुठे नष्टावशेषही सापडत नाहीत. धोक्याचा रेडिओ संदेशही आला नाही. विमानाची गत 'स्टार टायगर' सारखीच झाली.

✦ ✦ ✦

# १९. बोर्निओच्या जंगलात पुराणकाळचा शरभ ?



नृसिंहाने हिरण्यकश्यपूचा वध केल्यावर तो संतप्त दृष्टीने सर्वांकडे पाहू लागला. त्यावेळी नृसिंहाचे तेज प्रखर असल्यामुळे सर्वांना अत्यंत त्रास होऊ लागला. तेव्हा सर्वांनी नृसिंहाची स्तुती केली आणि तेज आवरण्याची विनंती केली. तरी नृसिंहाची संतप्त वृत्ति मावळली नाही. श्रीशंकरांनी वीरभद्राला त्याच्याकडे पाठविले. वीरभद्राने नृसिंहाची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण नृसिंहास गर्व झाला होता. मीच कर्तुमकर्तुम् आहे अशा भावनेने त्याने वीरभद्राचा आणि पर्यायाने शंकराचा अवमान केला. वीरभद्र शंकराकडे तसाच परत गेला. नृसिंहाच्या गर्वाचे त्याने शंकराजवळ वर्णन केले. तेव्हा शंकर फार संतापले. त्यांनी फार भयंकर असे शरभरूप धारण केले.

त्या शरभाचे पुढील धड पक्षाचे असून मागील धड सिंहाचे होते. अंगावर शस्त्राप्रमाणे तीक्ष्ण असे असंख्य पंख असून त्याला आठ पाय होते. त्या आठी पायांनी भूमी उकरीत आणि मोठ्याने

गर्जना करीत तो शरभ नृसिंहाजवळ आला. त्याला पाहून नृसिंहाचा अभिमान पार नष्ट झाला. शरभाने नृसिंहाचा पराभव केला.

शंकराचे शरभरूप ही पुराणकथा आहे. असे अर्धपक्षी–अर्धपशू-रूप हे कल्पनाविलासाचा एक पैलू आहे असे मानले जाते. अशी कथा, अशा आगळ्या प्राण्याचे अस्तित्व म्हणजे पुराणातली वांगी मानली जातात. ज्ञातसृष्टीच्या दृष्टीने असे मत होणे साहाजिकच आहे. पण –

पण जेव्हा अशासारख्या प्राण्याचे प्रत्यक्ष अस्तित्व आधुनिक जगातही आहे अशी वार्ता प्रसिद्ध होते तेव्हा मन दचकते. क्षणमात्र अविश्वास दाखवते. तरीही शेवटी वार्ता सत्य आहे असे पटल्यावर ‘ हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा ! ’ म्हणून गप्प रहाते.

अगदी अलीकडे नुकताच बोर्निओच्या जंगलात एक विचित्र प्राणी सापडला आहे असे वृत्त प्रसिद्ध झालेले वाचले. त्या प्राण्याचे वर्णन असे केले आहे.

त्या प्राण्याला हत्तीसारखी सोंड आणि दात आहेत. बकऱ्यासारखे कान आणि शिंगे आहेत. शरीर वाघासारखे आहे. शेपूटही तसेच. आणि पाय व पंजे सिंहासारखे आहेत. शिवाय पुढील पायांच्या वरच्या बाजूला पाठीवर दोन पक्षीसदृश पंख आहेत. त्याचे डोळे हत्तीसारखेच पण जरा मोठे आहेत.

अशा प्राण्याला पाहून माणूस दचकेल नाही तर काय ? ( मुखपृष्ठ या वर्णनावरूनच तयार केले आहे ! ) या प्राण्याचे दर्शन म्हणजे स्वप्नवत् वाटणे अगदी साहाजिकच आहे. पण दचकू नका ! खरं आहे हे !

२६८

✦ ✦ ✦

BVBK-[illegible]90268